सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ८ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नव्याने निवडून आलेल्या ११ नगरसेवकांचा अखवा गटच भाजपात, काँग्रेसला 'दे धक्का'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अंबरनाथ**

अंबरनाथमध्ये भाजप आणि काँग्रेसने केलेली युती राज्यात चर्चेत ठरली. येथील सत्ताधारी भाजपला काँग्रेस नगरसेवकांनी विकासाच्या मुद्द्यावरुन पाठिंबा दिला होता. त्यावरुन, सुरू झालेल्या राजकीय वादानंतर अखेर अंबरनाथ नगरपालिकेत मोठी घडामोड घडली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबरनाथमधील भाजप-काँग्रेस युतीवरुन थेट कारवाई केली आहे. येथील काँग्रेस पक्षाने नगरपालिका निवडणुकीत भाजपला समर्थन दिल्यानंतर काँग्रेसकडून येथील




सर्वच नगरसेवकांचे निलंबन करण्यात आले होते. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरुन अंबरनाथ ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रदीप पाटील यांना यासंदर्भात पत्र पाठवण्यात आले. त्यानंतर , आता येथील काँग्रेसच्या तब्बल ११ नगरसेवकांनी थेट काँग्रेसला बाय करत भाजपात प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला आहे, लवकरच हा पक्षप्रवेश होणार आहे.

अंबरनाथमध्ये भाजपने काँग्रेसला मोठा धक्का देत काँग्रेसच्या ११ नगरसेवकांना आपल्या गळाला लावले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हे सर्व नगरसेवक भाजपात प्रवेश करणार आहेत. नवी मुंबईत थोड्याच वेळात हा पक्ष प्रवेश संपन्न होईल.

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर आपण निवडणूक लढविली असून आपल्या पक्षाचे १२ सदस्य निवडून आलेले आहेत. मात्र, आपण प्रदेश कार्यालयास कोणतीही माहिती न देता अंबरनाथ नगरपालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसोबत गटबंधन केल्याचे प्रसार माध्यमांद्वारे कळाले. ही बाब अत्यंत चुकीची असून पक्षशिस्तीचा भंग करणारी आहे. ही बाब लक्षात घेता प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून आपणास काँग्रेस पक्षामधून निलंबित करण्यात येत आहे. तसेच आपली ब्लॉक काँग्रेस कार्यकारिणी बरखास्त करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आपल्या सोबत पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्या सर्व नगरसेवकांना सुध्दा पक्षामधून निलंबित करण्यात येत आहे, असे पत्रच काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी प्रमोद पाटील यांना पाठवले होते. त्यानंतर, दुसऱ्याच दिवशी नवनिर्वाचित तब्बल ११ काँग्रेस नगरसेवकांच्या गटाने भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

## संजय राऊत अन् एकनाथ शिंदेंची मुंबईत भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार ऐन भरात असताना मुंबईत एक महत्त्वाची राजकीय घडामोडी घडली आहे. मुंबईत गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतयांची भेट झाली. संजय राऊत आणि एकनाथ शिंदे हे गुरुवारी मुंबईत एका हिंदी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी एकनाथ शिंदे हे त्यांची मुलाखत आटोपून बाहेर पडत होते. यानंतर लगेचच संजय राऊत यांची मुलाखत होती. त्यासाठी ते स्टुडिओच्या दिशेने जात होते. त्यावेळी समोरुन एकनाथ शिंदे हेदेखील येत होते. हे दोन्ही नेते एकमेकांच्यासमोर आल्यानंतर त्यांनी एकमेकांकडे पाहून अभिवानद केले. यानंतर एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. संजय राऊत हे नुकतेच एका मोठ्या आजारपणातून बाहेर आले आहेत. ते आजारी असताना घरी होते तेव्हा एकनाथ शिंदे यांनी संजय राऊतांचे बंधू सुनील राऊत यांना फोन करुन राऊतांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. त्यानंतर आज या कार्यक्रमात संजय राऊत थेट



त्यांच्यासमोरच आले. तेव्हा एकनाथ शिंदे यांनी त्यांची विचारपूस केली. संजय राऊत यांनीही एकनाथ शिंदे यांच्या तब्येतीची चौकशी केली. यानंतर एक-दोन मिनिटं जुजबी गप्पा मारुन हे दोन्ही नेते आपापल्या दिशेने मार्गस्थ झाले. मात्र, या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे शिवसेना पक्ष फुटला होता. यानंतर शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला मिळाल्याने तो पक्ष अधिकृत शिवसेना ठरला होता. या सगळ्यामुळे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात प्रचंड वितुष्ट आले होते. मुंबई महानगपालिका निवडणुकीचा प्रचार सुरु झाल्यापासून ठाकरे कुटुंबीय सातत्याने एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत आहेत. संजय राऊतही त्यांच्या पत्रकारपरिषदेत सातत्याने एकनाथ शिंदे यांच्यावर आगपाखड करत असतात. मात्र, आज हे राजकीय मतभेद बाजुला सारुन या दोन्ही नेत्यांनी सुसंस्कृतपणे एकमेकांशी गप्पा मारल्या. त्यामुळे सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात या भेटीची चांगलीच चर्चा रंगली आहे.

## किशोरी पेडणेकर अडचणीत सापडण्याची शक्यता

### भाजपची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

मुंबईच्या माजी महापौर आणि शिवसेना नेत्या किशोरी पेडणेकर यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पेडणेकर यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात गुन्ह्यांची माहिती लपवून निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा खळबळजनक आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला. याप्रकरणी सोमय्या यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेत पेडणेकरांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.



किरीट सोमय्या यांनी दिलेल्या माहितीनुसार, किशोरी पेडणेकर यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्यावर दाखल असलेल्या फौजदारी गुन्ह्यांची माहिती उघड केलेली नाही. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, उमेदवाराला आपल्यावर असलेल्या सर्व गुन्ह्यांची माहिती देणे बंधनकारक असते. पेडणेकर यांनी ही माहिती जाणीवपूर्वक लपवली असून, हा मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रकार असल्याचे सोमय्या यांनी म्हटले.

कोविड काळात बॉडी बॅग कथित घोटाळा केल्याप्रकरणी आग्रीपाडा पोलीस ठाण्यात पेडणेकरांविरोधात गुन्हा दाखल आहे. तरवरळीतील गोमाता जनता एसआरए सोसायटीमधील झोपडपट्टीवासीयांचे गाळे बळकावल्याच्या आरोपावरून निर्मल नगर पोलीस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. किशोरी पेडणेकर यांनी ही सर्व माहिती दडवून निवडणूक आयोगाची फसवणूक केली आहे. याप्रकरणी मी पुराव्यानिशी तक्रार दिली असून, आता त्यांची चौकशी होणार आणि त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई देखील होणार, असा विश्वास किरीट सोमय्या यांनी व्यक्त केला आहे.

## मुंबई कळायला जन्माचा दाखला लागत नाही

### राज ठाकरेंच्या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीसांची खोचक प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

मुंबईत जन्माला आल्याशिवाय इथले प्रश्न समजत नाहीत, असे विधान करत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. देवेंद्र फडणवीस नागपूरचे आहेत. बाहेरून आलेल्या नेत्यांना मुंबईचे प्रश्न कळत नाहीत, असे राज ठाकरे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यावर आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी हसतच प्रत्युत्तर देत राज ठाकरेंवर खोचक सवाल उपस्थित केले आहेत.एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे यांच्या विधानावर भाष्य केले. मुंबई समजण्यासाठी मुंबईतच जन्म घ्यावा लागतो, असे राज ठाकरे म्हणाले. यावर मला हसू आले, असे सांगत फडणवीस म्हणाले, यापेक्षा मोठे नैराश्य दुसरे काय असू शकते? उद्या देश समजण्यासाठी पंतप्रधानांनी कुठे जन्म घ्यावा, असा प्रश्न पडेल.यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उदाहरण देत सांगितले की, गुजरातमध्ये जन्मलेले मोदीजींना




काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून अंदमानपर्यंत संपूर्ण देशाची जाण आहे. जन्मस्थानापेक्षा काम महत्त्वाचे असते.राज ठाकरे यांच्या टीकेला पुढे उत्तर देताना फडणवीस म्हणाले, समजा एका मिनिटासाठी मान्य करू की मला मुंबई कळत नाही आणि तुम्हाला कळते. मग इतक्या वर्षांत तुम्ही काय केले? मुंबईतील मराठी माणसासाठी काय बदल घडवला? आज मराठी माणसाला मुंबई सोडून दूर घर घ्यावे लागत आहे, याला कोण जबाबदार?मुंबई महापालिकेच्या कारभारावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. २५ वर्षे मुंबई महापालिका चालवली. कोणत्या पायाभूत सुविधा उभ्या केल्या? मुंबईत पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर उड्डाणपूल नागपूरचे नितीन गडकरी यांनी उभारले. वरळी-वांद्रे सी लिंक बांधून मुंबईच्या विकासाची सुरुवात झाली. त्यानंतर माझ्या काळात आणि एकनाथ शिंदे यांच्या काळात विकासाची गती वाढली, असे फडणवीस म्हणाले.शेवटी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, आम्ही मुंबईत जन्मलो नाही, हा आमचा दोष नाही. पण जे मुंबईत जन्मले, त्यांनी सत्तेत असताना काय केले, याचा हिशेब द्यायला हवा. त्यामुळे या टीकेतून नैराश्याशिवाय काहीही दिसत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली.

## एकमेकींचे केस ओढले रस्त्यात घातला राडा

### प्रचाराचे पैसे न मिळाल्याने महिलांची फ्री स्टाईल हाणामारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नाशिक**

राज्यात सध्या महापालिकेच्या निवडणुकीची लगबग सुरु आहे. निवडणुका काही दिवसांवर आल्याने पक्षातील नेते कार्यकर्ते जोमाने तयारीला लागले आहेत. पक्षाचा प्रचार करण्यासाठी दिवस रात्र एक करत आहेत. अनेक राजकीय पक्ष पुरूषांसोबतच महिलांना रोजंदारी देऊन प्रचारात सहभागी करून घेतात. सामान्यतः या महिलांना तीनशे ते पाचशे रुपये एवढी मजुरी दिली जाते. अशाच एका प्रचारादरम्यान महिलांमध्ये पैसे न दिल्याच्या रागातून तुफान हाणामारी झाली असल्याचं पाहायला मिळालं आहे. सदर घटना ही नाशिक मधील असून या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकमधील हा सर्व प्रकार अंबड पोलीस ठाण्याच्या आवाराबाहेर घडला. तब्बल ८५ महिला सकाळपासून प्रचार करत होत्या. दिवसभर त्या बसून राहिल्या, प्रचाराच्या कामात सहभागी झाल्या. मात्र, संध्याकाळी पैसे मिळण्याची वाट पाहताना त्यांना कोणतीही रक्कम देण्यात आली नाही.

याच दरम्यान, प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी या महिलांना जास्त मजुरी देण्याचे आमिष दाखवले आणि चालू प्रचार सोडून त्यांच्याकडे जाण्यास सांगितले. या गोंधळात महिलांनी एकमेकींना दोष देणे सुरू केले आणि वाद हाणामारीपर्यंत पोचला.या प्रकरणात जवळपास ८५ महिलांचे तब्बल तीस हजार रुपयांचे नुकसान झाले. संतापलेल्या महिलांनी थेट अंबड पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेली घटना पोलीसांना सांगितली.


मात्र, महिलांनी एकमेकींविरोधात कोणतीही लेखी तक्रार दिली नाही. यामुळे पोलिसांसमोर कारवाईचा मोठा पेच निर्माण झाला आहे. कोणत्याही बाजूने फिर्याद नसल्याने पोलिस फक्त समजूत घालून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, हाणामारीचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक ठिकाणी प्रचारासाठी अनेक महिला प्रचार करताना पाहायला मिळत आहेत.

## एलईडी व्हॅनद्वारे हायटेक प्रचाराला वेग

### प्रचार रॅलीपेक्षाही प्रभावी; मात्र उमेदवारांना वाहने मिळेना झाले मुश्कील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

महापालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. अवघे आठ दिवस मतदानाला शिल्लक राहिल्याने सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी कंबर कसली आहे. कमी वेळेत अधिकाधिक मतदारांपर्यंत उमेदवाराचे नाव व चिन्हे पोहोचविण्यासाठी प्रचारफेरी सोबतच आता एलईडी व्हॅनच्या माध्यमातून हायटेक प्रचाराला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे सध्या चौकाचौकांत सध्या एलईडीजऊइारे हायटेक प्रचार करणारे वाहने दिसत आहे.



निवडणूक म्हटली म्हणजे प्रचार आलाच. पूर्वपरंपरागत पद्धतीनुसार घरोघरी भेटी देऊन हात जोडत मतदान करण्याची विनंती करत प्रचार केला जातो. त्याही पुढे जाऊन आता पत्रक (प्रॉस्पेक्ट ) तयार करून त्याद्वारे घरोघरी केलेली कामे आणि करावयाच्या कामांचा जाहीरनाम्यासह उमेदवाराचे छायाचित्र व पक्षाचे चिन्ह छापून वाटप केले जातात. तर कॉर्नर सभा, जाहीर सभा हा शेवटचा टप्पा ठरलेला असतो.

मात्र हल्ली निवडणुकीसाठीही कालमर्यादा कमी झाली आहे. वेळ कमी आणि प्रभाग परिसर मोठा, त्यात मतदार संख्या वाढल्याने निवडणुकांत चुरस वाढली आहे. परिणामी उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यात सर्वसामान्य उमेदवारांपुढे तर खर्चाबाबतही तजबिज नसल्याने जेवढे होईल तेवढे घरभेटीद्वारे प्रचार करीत आहेत.

राजकारणात मुरलेले, राजकीय परंपरा असलेले आणि आर्थिक स्थिती चांगली असलेले उमेदवार मात्र हायटेक प्रचाराकडे वळले आहेत. त्यांचाकडून सध्या वाहनांवर मोठी एलईडी स्क्रीन लावून त्यातील चित्रफितीद्वारे उमेदवाराचे व पक्षाचे कार्य आणि चिन्ह मतदारांमध्ये बिंबवले जात आहे. त्यासाठी चौकाचौकांत एलईडी प्रचार वाहने तासन्तास थांबवून प्रचार केला जात आहे. या हायटेक प्रचाराचा खर्च मोठा आहे.

एका एलईडीची किंमत, वाहन भाडे , चालक आणि चित्रफीत निर्मिती खर्च याचे गणित मोठे आहे. तरीही या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने काही व्यावसायिकांनी याच धंदा बनवला आहे, ते ही यंत्रणा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देत आहेत. त्यात काही उमेदवार प्रतिदिन दराने तर काही जणांनी पूर्ण निवडणुकीचा प्रचाराचा ठेका ठरावीक रक्कम देऊन निश्चित केला आहे.

एकाच वेळेस सर्वत्र महापालिका निवडणुका असल्याने एलईडी प्रचार वाहनांचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे या वाहनधारकांचेही डिमांड वाढले आहे. त्यामुळे दरही तेजीत आहेत. साधारण प्रतिदिन ५० हजार ते एक लाख भाडे आकारले जात आहे. त्यात एका दिवसात किती परिसरात प्रचार केला जाईल, त्यावर हे दर निश्चित केले गेले आहेत. निवडणुकीतएलईडी प्रचाराची क्रेझ मात्र भाव खाऊन जात असल्याचे राजकीय कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

## बुलढाण्यात 'लाडकी बहीण' योजनेचा गैरफायदा अपात्र शासकीय कर्मचाऱ्यांकडून निधी वसूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८बुलढाणा**

बुलढाणा : राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार समोर येऊ लागले आहेत. बुलढाणा जिल्ह्यात शासकीय सेवेत असतानाही या योजनेचा लाभ घेतल्याचा प्रकार उघडकीस आला असून, शासनाने अशा अपात्र लाभार्थ्यांवर थेट कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्यांकडून आतापर्यंत मिळालेली संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाईची तयारी सुरूआहे.

बुलढाणा जिल्ह्यात विविध शासकीय विभागांत कार्यरत असलेल्या १९६ कर्मचाऱ्यांची यादी महिला व बालकल्याण विभागाला मिळाली होती. या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली. तपासणीत १९० कर्मचारी हे अर्धवेळ स्वरूपाचे असून त्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असल्याने ते योजनेसाठी पात्र ठरले. मात्र उर्वरित ६ शासकीय कर्मचारी अपात्र असल्याचे समोर आले.

या सहा कर्मचाऱ्यांनी प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये असा लाभ घेतल्याचे समोर आले. त्यामुळे शासनाने त्यांच्याकडून एकूण ९९ हजार रुपयांची रक्कम वसूल केली आहे. याशिवाय संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवण्यात आला असून, लवकरच पुढील कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, शासनाच्या योजनेचा गैरफायदा घेणे या कर्मचाऱ्यांना चांगलेच महागात पडले आहे.या योजनेअंतर्गत महिलांचे वय २१ ते ६५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, अशी अट घालण्यात आली आहे. लाभ घेण्यासाठी ई-केवायसी करणेही बंधनकारक आहे. मात्र काही महिलांनी चुकीची माहिती सादर करून अर्ज केल्याचे तपासणीत उघड झाले आहे. अशा प्रकरणांमध्ये आता टप्प्याटप्प्याने कारवाई केली जाणार असल्याचे संकेत शासनाकडून देण्यात आले आहे.

## संपादकीय ......

# अजितदादांच्या शांततेत वादाचे बीज!

*सत्ताधारी महायुतीत सध्या जे घडत आहे, ते महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिकता, संधीसाधूपणा आणि सत्तेसाठी होणारी वैचारिक तडजोड यांना उघडे पाडणारे आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, 'माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप करणार्यांसोबतच मी सत्तेत आहे', असे विधान करून जे दार उघडले, त्यातून आता भाजपने थेट वैचारिक आणि राजकीय हल्ला चढवला आहे. या सगळ्या गदारोळात अजित पवारांची बदलती भूमिका, त्यांची सोयीची शांतता आणि निवडणुकीनंतर उत्तर देण्याची दिलेली वेळ, हे सारेच प्रश्नांकित ठरत आहे. अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत अनुभवी, मुत्सद्दी आणि तितकेच आक्रमक नेते म्हणून ओळखले जातात.*

*सत्ता, प्रशासन आणि निर्णयप्रक्रिया यांचे सखोल ज्ञान असलेला हा नेता आज मात्र स्वत:च्या विधानांमुळे आणि युतीतील विसंगतींमुळे अडचणीत सापडलेला दिसतो. सिंचन घोटाळ्याचा उल्लेख करून त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपला आणि विशेषत: देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले. एकेकाळी याच आरोपांच्या आधारे भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार हल्ले चढवले होते, आंदोलनं केली होती आणि अजित पवारांना भ्रष्टाचाराचे प्रतीक म्हणून रंगवले होते. आज तेच भाजप आणि तेच अजित पवार सत्तेत एकत्र आहेत, ही विसंगती अजित पवारांनी जाहीरपणे मांडली, हे वास्तव असले तरी त्यामागील राजकीय गणित तितकेच गुंतागुंतीचे आहे.*

*भाजपने मात्र या विधानाला केवळ स्पष्टीकरण देऊन सोडले नाही. भाजप नेते अॅड. आशिष शेलार यांनी थेट वीर सावरकरांचा मुद्दा उपस्थित करून वादाला वैचारिक वळण दिले. 'युतीत आहात, तर सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील,' असे सांगून त्यांनी अजित पवार आणि त्यांच्या पक्षासमोर एक नवा प्रश्न उभा केला. खरे तर हा प्रश्न राजकीय अधिष्ठानाचा आहे. भाजपसाठी सावरकर हे वैचारिक प्रतीक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेससाठी मात्र सावरकर हा नेहमीच सोयीचा किंवा गैरसोयीचा विषय राहिला आहे. काँग्रेसच्या परंपरेत वाढलेल्या, पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष राजकारणाची भाषा करणार्या राष्ट्रवादीसाठी सावरकरांचे संपूर्ण समर्थन करणे ही सहज गोष्ट नाही.*

*याच ठिकाणी अजित पवारांची बदलती भूमिका ठळकपणे दिसते. एकेकाळी भाजप-शिवसेनेवर कठोर टीका करणारे, हिंदुत्वाच्या राजकारणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे अजित पवार आज सत्तेसाठी त्याच भाजपसोबत बसले आहेत. तेव्हा त्यांनी विचारधारेबद्दल फारसे भाष्य केले नाही, ना विरोध केला, ना समर्थन. हीच त्यांची आजची अडचण आहे. भाजपने जेव्हा सिंचन घोटाळ्याची आठवण करून दिली, तेव्हा ते गप्प. सावरकरांचा मुद्दा उभा राहिला, तेव्हा 'निवडणुकीनंतर उत्तर देईन' अशी वेळ मारून नेणारी भूमिका त्यांनी घेतली. ही शांतता परिपक्वतेची आहे की राजकीय असहायतेची, हा प्रश्न यातून उपस्थित होतो.*

*चंद्रकांत बावनकुळे यांनी '७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा निकाल अजून लागलेला नाही' असे सांगून भाजपच्या जुन्या भूमिकेची आठवण करून दिली. म्हणजेच, गरज असेल तेव्हा आरोप, आणि सत्ता टिकवायची असेल तेव्हा मौन, असा हा सत्तेचा खेळ उघडपणे समोर येतो. भाजप एका बाजूला अजित पवारांवर दबाव ठेवत आहे आणि दुसर्या बाजूला युतीही टिकवून ठेवत आहे. ही दुहेरी भूमिका भाजपसाठी जितकी फायदेशीर आहे, तितकीच राष्ट्रवादी आणि विशेषत: अजित पवारांसाठी अडचणीची ठरत आहे. अजित पवारांनी 'मला विकासाबद्दल प्रश्न विचारा', असे सांगणेही अर्थपूर्ण आहे. विकासाची भाषा ही नेहमीच सुरक्षित असते. त्यात विचारधारा, इतिहास, मूल्ये यांचा संघर्ष नसतो. मात्र राजकारण केवळ विकासावर चालत नाही.*


*सत्ताधारी युतीतील पक्षांचे विचार, त्यांची पूर्वीची भूमिका आणि आजची तडजोड, हे सारे मतदार पाहत असतो. अजित पवार यांना हे माहीत आहे, म्हणूनच कदाचित ते सध्या थेट उत्तर देणे टाळत आहेत. पण प्रश्न असा आहे की, ही भूमिका किती काळ टिकणार? निवडणुकीनंतर उत्तर देण्याचे आश्वासन म्हणजे आजच्या प्रश्नांना उद्याची तारीख लावण्यासारखे आहे. सत्तेत असताना घेतलेल्या भूमिकांची जबाबदारी टाळता येत नाही. एकेकाळी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे, ईडी-सीबीआयच्या कारवाईचा सामना करणारे अजित पवार आज त्याच भाजपसोबत सत्तेचा भाग आहेत. ही वस्तुस्थिती आहे. पण या वस्तुस्थितीचे नैतिक, वैचारिक आणि राजकीय स्पष्टीकरण देणे ही त्यांची जबाबदारी आहे.*

*आजचा वाद सावरकरांचा असला, तरी उद्या तो दुसर्या कुठल्या मुद्द्यावर असेल. प्रश्न व्यक्तीचा नाही, तर भूमिकेचा आहे. अजित पवार हे राजकारणात टिकून राहण्यासाठी भूमिका बदलतात, हे नवे नाही. मात्र प्रत्येक वेळी बदललेल्या भूमिकेला काहीतरी तात्त्विक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला जात असे. आज मात्र ती चौकटही धूसर होताना दिसते. सत्तेच्या गणितात विचार मागे पडतोय का, हा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणाला पडलेला आहे. या सगळ्या कलगीतुर्यात भाजप आपली वैचारिक आघाडी सोडायला तयार नाही आणि राष्ट्रवादी सत्ता सोडायला. या संघर्षात अजित पवार मधोमध उभे आहेत. त्यांची आजची शांतता उद्याच्या वादांचे बीज ठरू शकते. कारण राजकारणात मौन कधी कधी उत्तरांपेक्षा अधिक बोलके असते. आणि अजित पवारांचे सध्याचे मौन अनेक प्रश्न निर्माण करत आहे, ज्यांची उत्तरे केवळ निवडणुकीनंतर नव्हे, तर आताच अपेक्षित आहेत.*

# तूर पिकात होणार क्रांती; मराठवाडा कृषि विद्यापीठ विकसित 'ह्या' नवीन संकरित वाणाला मान्यता

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राद्वारे विकसित करण्यात आलेल्या तुरीच्या बीडीएनपीएच-२०१८-०५ या संकरित वाणास केंद्र शासनाकडून अधिकृत अधिसूचनेद्वारे मान्यता देण्यात आली आहे.




महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांद्वारे शिफारस करण्यात आलेला हा पहिलाच तुरीचा संकरित वाण असून, भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. ड.ज. ६१२३(ए), दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अन्वये बीडीएनपीएच-२०१८-०५ या वाणास अधिसूचित वाण म्हणून घोषित करण्यात आले आहे. हा वाण महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या राज्यांसाठी शिफारसीत करण्यात आला असून, कोरडवाहू तसेच सिंचित परिस्थितीत लागवडीस योग्य आहेत. यानिमित्त बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या कडधान्य उत्पादन मोहिमेसाठी नुकताच अधिसूचित करण्यात आलेला तुरीचा संकरित वाण बिडिएनपीएच १८-०५ हा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल. या वाणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची भरीव आर्थिक उन्नती साधता येईल. तसेच हा वाण कोरडवाहू तसेच बदलत्या हवामानाच्या परिस्थितीतही उपयुक्त ठरेल. विद्यापीठ शेतकरी देवो भव: या भावनेतून सातत्याने कार्य करत असून, बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राने यापूर्वी तुरीच्या वाणांच्या विकासामध्ये राष्ट्रीय पातळीवर अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.

यामध्ये प्रामुख्याने तुरीच्या गोदावरी या वाणापासून शेतकऱ्यांनी कोरडवाहू क्षेत्रात एकरी १० ते १२ क्विंटल तर ठिबक सिंचनाखाली लागवड केल्यास जवळपास १८ क्विंटलपर्यंत उत्पादन घेतले आहे.

गोदावरी वाणामुळे शेतकऱ्यांना साधारणपणे एकरी एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत असल्याच्या प्रतिक्रिया विद्यापीठास प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी विद्यापीठाद्वारे विकसित तुरीच्या गोदावरी वाणाकडे ऊसाला पर्यायी पीक म्हणून पाहत आहेत.

याचप्रमाणे बिडिएनपीएच २०१८-०५ हा संकरित वाणही शेतकऱ्यांसाठी तितकाच लाभदायक ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी सांगितले की, या नवीन वाणाच्या प्रसारामुळे तुरीच्या पिकाचे उत्पादन तसेच उत्पादनातील स्थैर्य वाढण्यास मोठी मदत होणार असून, शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

**वाणाची वैशिष्ट्ये-** या वाणाची उत्पादकता १,७५९ ते २,१५९ किलोग्रॅम प्रति हेक्टरी इतकी आहे. हा वाण १५५ ते १६० दिवसात तयार होतो. दाण्याचा रंग पांढरा आहे. मर आणि वांझ या तुरीच्या प्रमुख रोगांकरिता हा वाण मध्यम प्रतिकारक आहे. किडींना कमी बळी पडतो.

# कधी भाकरी खाल्लयानं जास्त फायदा होतो..

**दि. ८ विदर्भ प्रजासत्ताक**

थंडीच्या दिवसांत चपाती, पुरी असे पदार्थ खाण्यापेक्षा शरीराला उष्णता देण्यासाठी भाकरी खाण्याला प्राधान्य दिले जाते. बाजरीची किंवा ज्वारीची भाकरी त्यासोबत झुणका, पालेभाजी किंवा चटणी असेल तर उत्तम बेत होतो पण भाकरी नेमकी कधी खावी असा प्रश्न अनेकाना पडतो काहीजणांना एक वेळच्या जेवणात भातच लागतो भात खाल्लयाशिवाय पोटच भरत नाही. थंडीत भाकरी खाण्याचं महत्व आणि वेळेबाबतची ही माहिति तुम्हाला नक्कीच उपयोगी पडेल.






हिवाळ्यात भाकरी खावी असं का म्हणतात?

आयुर्वेदानुसार आणि पोषणशास्त्रानुसार बाजरी ही उष्ण गुणधर्माची असते. थंडीत शरीराचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि शरीराला उब मिळावी यासाठी बाजरीची भाकरी गुणकारी ठरते. बाजरीमध्ये लोह, मॅग्नेशियम आणि फायबर्स भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे इम्युनिटी वाढते.

तज्ज्ञांच्यामते भाकरी खाण्याची वेळ तुमच्या पचनशक्तीवर आणि जीवनशैलीवर अवलंबून असते. दुपारच्या वेळी आपली पचनशक्ती सर्वात चांगली असते. बाजरी किंवा ज्वारीची भाकरी पचायला थोडी जड असते. त्यामुळे दुपारी खाणं सर्वात उत्तम मानले जाते. दुपारी भाकरी खाल्लयानं शरीराला दिवसभर काम करण्यासाठी भरपूर उर्जा मिळते आणि दीर्घकाळ भूक लागत नाही.

जर तुम्ही रात्री लवकर जेवत असाल संध्याकाळी ७ ते ८ च्या दरम्यान आणि जेवणानंतर थोडं चालत असाल तर रात्री भाकरी खाण्यास हरकत नाही. मात्र रात्री उशिरा जेवणाऱ्यांनी बाजरीची भाकरी टाळलेलीच बरी. कारण ती पचायला जड असल्यामुळे पोटाचे विकार उद्भवू शकतात. तसंच रात्री ज्वारीची भाकरी खाणं हा एक हलका आणि चांगला पर्याय ठरू शकतो.

भाकरीसोबत तूप किंवा गुळाचा खडा खावा. यामुळे भाकरीचा कोरडेपणा कमी होतो. मेथी,शेपू यांसारख्या पालेभाज्या खाणं अधिक चांगलं ठरतं. थंडीत अति प्रमाणात बाजरी खाऊ नये कारण यामुळे उष्णतेचे विकार होऊ शकतात. दिवसातून एकदा भाकरी खाणं पुरेसं आहे. जर तुम्हाला पचनाचा कोणताही त्रास नसेल तर तुम्ही दुपारी किंवा रात्री कधीही भाकरी खाल्ली तरी चालेल.

# अमरावती महानगरपालिकेत स्वीप उपक्रमांतर्गत पथनाट्याच्या माध्यमातून प्रभावी मतदान जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. नुकत्याच वडाळी, यशोदा नगर, उत्तम नगर, चैतन्य कॉलनी, साईनगर आणि विलास नगर या भागात पथनाट्याद्वारे नागरिकांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगण्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून त्यांनी यावेळी नव मतदार आणि नागरिकांना मतदानाच्या प्रक्रियेबाबत सखोल माहिती दिली.



सादर करण्यात आलेल्या पथनाट्यामध्ये मतदानाचे महत्त्व, नागरिकांचा कर्तव्य म्हणून मतदान करणे, तसेच योग्य उमेदवाराची निवड करणे या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला. स्विप विभागांतर्गत हा उपक्रम नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मतदानासाठी उत्सुकता निर्माण करण्यासाठी राबवला जात आहे. यामध्ये नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होत असल्याचे दिसून आले आहे, जे मतदानाच्या प्रक्रियेत सामील होण्याची संधी आणि जबाबदारी याची जाणीव करून देते.

विशेषतः या कार्यक्रमादरम्यान नव मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या वर्षी पहिल्यांदाच मतदान करणार्या नव मतदारांनी मतदानाच्या दिवसाची १५ जानेवारी रोजी आतुरतेने वाट बघत असल्याचे दिसून आले. मनपा प्रशासनाकडून नव मतदारांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी मतदान करताना कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाला बळी पडू नये आणि जाणीवपूर्वक योग्य उमेदवाराची निवड करावी.

पथनाट्याच्या वेळी उपस्थित नागरिकांना स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाची शपथ घेण्याची संधी देखील देण्यात आली, ज्यामुळे मतदानाचे महत्त्व अधिक प्रभावीपणे समजावले गेले. यामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होईल आणि सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यास हातभार लागेल.

स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या पथनाट्याच्या कार्यक्रमामुळे नागरिकांना मतदानाचा कर्तव्यपरायण दृष्टिकोन समजून घेता आला असून, त्यांचा सहभाग वाढण्यास प्रोत्साहन मिळाले. मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांमध्ये मतदानाबाबत जाणीव निर्माण करणे हे महत्त्वाचे असून, आगामी निवडणुकांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना सतत मतदानासाठी प्रेरित करण्याचे प्रयत्न राबविले जात आहेत.

पथनाट्याद्वारे जनजागृती, मतदान शपथ घेणे आणि नव मतदारांना प्रोत्साहित करणे यामुळे शहरातील निवडणूक प्रक्रियेत सहभाग वाढण्यास निश्चितच मदत होईल.

# उद्या आकाशात दिसणार 'ऑपोजिशन ऑफ ज्युपिटर'!

## कधी पाहता येणार गुरु ग्रह पृथ्वीच्या अधिक जवळ येणारा क्षण ?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती-**

सौरमालेतील सर्वात मोठा ग्रह असलेला गुरु शुक्रवार, ९ जानेवारी रोजी आकाशात एका महत्त्वाच्या खगोलीय अवस्थेत दिसणार आहे. पृथ्वी आणि सूर्याच्या तुलनेत गुरु ग्रह अगदी विरुद्ध दिशेला येत असल्याने ही घटना खगोलशास्त्रात 'ऑपोजिशन ऑफ ज्युपिटर' म्हणून ओळखली जाते. या अवस्थेत गुरु ग्रह पृथ्वीच्या तुलनेत अधिक जवळ येतो आणि त्यामुळे तो नेहमीपेक्षा अधिक तेजस्वी, मोठा व स्पष्ट दिसतो. सूर्यास्तानंतर पूर्व क्षितिजावर साध्या डोळ्यांनीही गुरु ग्रहाचे निरीक्षण करता येणार असल्याने खगोलप्रेमींसाठी ही एक दुर्मीळ संधी ठरणार आहे.

खगोल व ज्योतिष अभ्यासक डॉ. अनिल वैद्य यांच्या माहितीनुसार, गुरु ग्रह सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी साधारण १२ वर्षांचा कालावधी घेतो. पृथ्वी त्याच्या तुलनेत अधिक वेगाने सूर्याभोवती भ्रमण करत असल्याने दर सुमारे १३ महिन्यांनी पृथ्वी-गुरु युती किंवा ऑपोजिशनची स्थिती निर्माण होते. याच खगोलीय प्रक्रियेचा परिणाम म्हणून ९ जानेवारी रोजी गुरु ग्रह पृथ्वीच्या दृष्टीने सूर्याच्या अगदी विरुद्ध बाजूस स्थित राहणार आहे.

या दिवशी गुरु ग्रह सूर्यापासून सुमारे ७८ हजार कोटी किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर असला, तरी पृथ्वीच्या तुलनेत त्याचे अंतर तुलनेने कमी असल्याने तो आकाशात ठळकपणे उठून दिसेल. सायंकाळी सूर्य पश्चिम क्षितिजावर मावळल्यानंतर लगेचच पूर्व दिशेला गुरु ग्रह तेजस्वी पिवळसर प्रकाशासह उगवताना दिसेल. विशेष म्हणजे, या निरीक्षणासाठी दुर्बिणीची आवश्यकता भासणार नाही.खगोल अभ्यासकांच्या दृष्टीने 'ऑपोजिशन' अवस्था अत्यंत महत्त्वाची मानली जाते, कारण या काळात ग्रहाचा अभ्यास, छायाचित्रण तसेच त्याच्या हालचालींचे निरीक्षण अधिक अचूकपणे करता येते. स्वच्छ आकाश असल्यास शहरासह परिसरातील ग्रामीण भागातही हे दृश्य सहज अनुभवता येणार आहे. डॉ. अनिल वैद्य यांनी शाळा, महाविद्यालये, विज्ञान मंडळे आणि खगोलप्रेमी संस्थांनी सामूहिक निरीक्षण कार्यक्रम राबवावेत, असे आवाहनही केले आहे. अशीच खगोलीय स्थिती पुन्हा बुधवार, १० फेब्रुवारी २०२७ रोजी अमरावती करांना अनुभवता येणार आहे.


# आ.प्रकाश भारसाकळेंनी लावला सुरुंग; प्रदेशाध्यक्षांनी बजावली नोटीस

## सत्तेसाठी 'एआयएमआयएम'शी जवळीक अंगलट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला**

राजकारण व विचारधारेचे कट्टर विरोधक भाजप आणि 'एआयएमआयएम' पक्षांचे नगरसेवक सत्ता समीकरणासाठी अकोट विकास मंचाच्या नावावर एकत्र आणण्याचा प्रताप अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या चांगलाच अंगलट आला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भिन्न विचारधारेमुळे युती शक्य नसल्याचे दोन्ही पक्षाच्या नेतृत्वाने स्पष्ट केले. पक्षाच्या ध्येय धोरणाला सुरुंग लावणाऱ्या आमदार भारसाकळे यांना भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नोटीस बजावून खुलासा देण्याचे आदेश दिले आहेत.

भाजप व 'एआयएमआयएम'च्या कथित



युतीवरून राज्याच्या राजकारणात चांगलाच गोंधळ उडाला. दोन्ही पक्षांच्या नेत्यांची चांगलीच कोंडी झाली. हे सगळे घडवून आणण्यामागे अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे असल्याचे समोर आले. अकोट नगरपालिका निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदावर भाजपच्या माया धुळे विजयी झाल्या. नगरसेवक पदाच्या ३३ पैकी ११ जागांवर भाजप, काँग्रेस सहा, शिवसेना एक, वंचित व राष्ट्रवादी दोन, 'एआयएमआयएम' पाच, शिवसेना ठाकरे गट दोन, राष्ट्रवादी शरद पवार गटाला एक जागा मिळाली. कुणाकडेही बहुमत नसल्याने अकोट विकास मंचाची स्थापना भाजपने केली. यामध्ये 'एआयएमआयएम'चे पाच नगरसेवकही सहभागी झाले होते.

### प्रदेशाध्यक्षांनी आमदारांची काढली खरडपट्टी

अकोट नगरपालिकेमध्ये भाजपच्या नेतृत्वातील अकोट विकास मंचामध्ये 'एआयएमआयएम'च्या नगरसेवकांना सोबत घेण्याच्या मुद्द्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आमदार प्रकाश भारसाकळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पक्षाच्या ध्येय धोरणाला सुरुंग लावला असून कोणालाही विश्वासात न घेता आपल्या कृतीतून पक्षाची प्रतिमा मलिन केल्याचे प्रदेशाध्यक्षांनी पत्रात नमूद करीत आमदारांना चांगलेच सुनावले. आपल्यावर कारवाई का करण्यात येऊ नये, याचा खुलासा करण्याचे आदेश प्रदेशाध्यक्षांनी आ.भारसाकळेंना दिले आहेत. आता प्रकाश भारसाकळे त्यावर काय उत्तर देतात, याकडे लक्ष लागले आहे.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ८ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# अमरावतीतील महापालिका निवडणूक पक्षांतर्गत तणाव

## १९ माजी नगरसेवक मैदानात; पक्षांना बंडखोरीचा मोठा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –** अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीला नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर रणसंग्रामाची सुरुवात झाली आहे. ही निवडणूक केवळ सत्ताबदलापुरती मर्यादित नसून, अनुभव विरुद्ध बंडखोरी असा संघर्ष उभा राहणार आहे. यंदा १९ माजी नगरसेवक पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत, तर पक्षांतर्गत नाराजी आणि बंडखोरीमुळे ही निवडणूक ऐतिहासिक वळणावर आली आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या ३३ वर्षांच्या इतिहासात सलग निवडणुकीत विजय मिळवणारे विलास इंगोले हे एकमेव नगरसेवक ठरले आहेत. इंगोले यांनी अनेक टर्म्समध्ये नगरसेवक तसेच महापौरपदाची जबाबदारी पार पाडली असून, त्यांचा अनुभव यंदाही काँग्रेससाठी महत्त्वाचा मानला जात आहे. ते जवाहरगेट बुधवारा प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणूक लढवत आहेत.

इतिहासाकडे पाहता, भाजपचे कुसुम साहू आणि चेतन पवार प्रत्येकी पाच वेळा, तर प्रदीप बाजड सुमारे चार वेळा विजय मिळवला आहे. प्रकाश बनसोड यांनीही तितक्याच वेळा सभागृह गाठले. बाळू भुयार, रतन डेंडुले, मिलींद बांबल, राधा कुरील, प्रमोद पांडे आणि सुनंदा खरड हे नगरसेवक दोन किंवा त्याहून अधिक वेळा निवडून आले आहेत. काही माजी नगरसेवक निवडणुकीपासून अलिप्त राहणे पसंत करतात, तर काहींनी पक्षबदल किंवा बंडखोरीचा मार्ग स्वीकारला आहे.

यंदा सर्वात मोठा धक्का म्हणजे दोन्ही प्रमुख पक्षांना आतून बंडखोरीचा सामना करावा लागत आहे. माजी




नगरसेवकांपैकी किमान ८ ते १० जण या वेळी पक्षविरोधात किंवा अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. भाजपमध्ये ही बंडखोरी सर्वाधिक आहे, नाकारलेल्या उमेदवारांचा रोष स्पष्ट दिसतो, तर काँग्रेसलाही अंतर्गत नाराजीचा फटका बसला आहे. काही भागात तर थेट बंडखोरीची घोषणा झाली आहे, तर काही माजी नगरसेवकांनी निवडणूक न लढवता राजकीय विश्रांती घेतली आहे.

या बंडखोर उमेदवारांमुळे पारंपरिक मतपेढ्या तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. १९९२ मध्ये महापालिका अस्तित्वात आल्यानंतर राज्यात अनेक राजकीय स्थित्यंतरे पाहायला मिळाली आहेत. यंदा १६ जानेवारीला सतराव्या महापौराची निवड होणार आहे, ज्यासाठी सत्तासमीकरण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे.

एकंदरीत, अनुभवसंपन्न माजी नगरसेवक विरुद्ध नाराज बंडखोर, पक्षनिष्ठा विरुद्ध व्यक्तिगत ताकद, जुने चेहरे विरुद्ध नव्या प्रयोग या त्रिसूत्रीवर यंदाची महापालिका निवडणूक लढवली जाणार आहे.अमरावतीच्या राजकीय इतिहासात हा संघर्ष निश्चितच नवा अध्याय लिहणार आहे.

# कमळाच्या विरोधातला प्रचार अमान्य

## –पालकमंत्री बावनकुळे यांची स्पष्ट भूमिका

### भाजपाचा वचननामा केला प्रसिद्ध



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**

महापालिका निवडणुकीत कमळाच्या विरोधातला प्रचार कोणत्याही स्थितीत मान्य नाही. कोणत्या पदाधिकार्यांनी तो केला तर पक्ष त्याची योग्य दखल घेईल, अशी स्पष्ट भूमिका भाजपाचे निवडणूक प्रमुख व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडली.


महापालिका निवडणुकीसाठी भाजपाचा वचननामा त्यांनी बुधावारी हॉटेल मैफिल येथे प्रसिद्ध केला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. अनिल बोंडे, शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, आ. संजय कुटे, माजी मंत्री प्रवीण पोटे, आ. प्रताप अडसड, आ. केवलराम काळे, आ. राजेश वानखडे, किरण पातुरकर, शिवराय कुळकर्णी, सुनील खराटे, संजय तिरथकर यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे पुढे म्हणाले, महापालिका निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या भाजपच्या उमेदवारांच्या विजयासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पक्ष मोठा आहे.जे नेते विरोधात काम करीत आहेत, त्यांची पक्ष योग्य वेळी दखल घेणार आहे. त्यांनी भाजप उमेदवारांसाठी काम करणे व त्यांना निवडून आणणे अपेक्षीत आहे. वचननामावर ते म्हणाले, अमरावती शहर सीसीटीव्ही कॅमेर्याच्या कक्षेत आणू, शहराच्या विकासासाठी शासनाकडे ११० कोटीचा प्रस्ताव ठेऊ, प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल उपलब्ध करून देऊ, नेहरू मैदानाचा विकास करू, एसएसआरडीसीच्या माध्यमातून शहरातल्या १० जागांचा विकास करू, आयटी पार्क उभारण्यासाठी प्रयत्न करू, पाणी पुरवठा योजनेच्या नव्या पाईप लाईनचे काम लवकर पूर्ण करू, भुयारी गटार योजनेचे काम हाती घेऊ, छत्री व वडाळी तलावाचा विकास करू, अंबा व एकविरा देवी परिसराचा विकास आराखडा मंजूर करू, अंबा नाल्याचे बांधकाम करू, स्वच्छ व सुंदर शहरासाठी कचरा व्यवस्थापनाची नवी पद्धत आणण्याची तयारी आम्ही सुरू केली आहे. भाजपाला मत म्हणजे विकासाला मत, असे समिकरण आहे. शहराच्या विकासाचे द्वार उघडण्याची वेळ आली. नारिकांनी आमच्या शहरा विकासाच्या वचननाम्याची दखल घेऊन भाजपा उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# संत गुलाबराव महाराजांचा शासनाकडून गौरव

## शासकीय जयंती साजरा करण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** विदर्भाच्या अध्यात्मिक, सामाजिक व वैचारिक परंपरेतील एक अत्युच्च शिखर म्हणून ओळखल्या जाणार्या प्रज्ञाचक्षु धर्मसमन्वयमहर्षी, ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती यावर्षीपासून महाराष्ट्र शासनातर्फे अधिकृतरीत्या साजरी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित झाला आहे.सदर निर्णय केवळ एका जयंती उत्सवापुरता मर्यादित नसून राज्याच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वैचारिक वारशाला सशक्त अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. विदर्भाच्या भूमीत जन्मलेल्या या अलौकिक संताच्या विचारसरणीला आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्याला शासनस्तरावर मान्यता मिळाल्याने संतपरंपरेच्या गौरवात भर पडली असून, महाराष्ट्राच्या आध्यात्मिक इतिहासात हा निर्णय एक महत्त्वाचा अध्याय ठरणार असल्याचे मत महाराजांच्या भक्तांनी व्यक्त केले आहे. श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहिमेचे प्रमुख तसेच वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा (ता. चांदुरबाजार, जि. अमरावती) यांचे प्रसिद्धी प्रमुख माधुर्य ठाकरे यांनी या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. त्यांनी नमूद केले की, शासनाने घेतलेला हा निर्णय विदर्भाच्या संतपरंपरेला न्याय देणारा असून, समाजातील विविध



घटकांपर्यंत संतांच्या विचारांचा प्रभावी प्रसार घडवून आणणारा आहे.

या प्रक्रियेमध्ये महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार श्रीकांत भारतीय, माजी आमदार प्रवीण पोटे तसेच माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा यांच्या वतीने २६ जून २०२३ रोजी शासनाकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, ज्यावर सातत्यपूर्ण पाठपुरावा व सकारात्मक प्रशासनात्मक प्रतिसाद मिळाल्याचे स्पष्ट होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विस्मय ठाकरे यांनी या शासकीय निर्णयाचे स्वागत करताना मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त केले आहेत. त्यांनी सांगितले की, या निर्णयामुळे श्री संत गुलाबराव महाराज यांची समृद्ध ग्रंथसंपदा, तात्त्विक चिंतन व समाजोद्धारक विचार शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग खुला झाला आहे. यापुढे श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये साजरी करण्यात येणार असल्याने, महाराजांचे विचार केवळ भक्तांपुरते न राहता सामान्य जनतेपर्यंत, विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील. परिणामी विदर्भातील हा अलौकिक संत संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात पोहोचून सामाजिक समरसता, वैचारिक प्रगल्भता व अध्यात्मिक जागृतीस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून, या निर्णयामुळे भक्तपरिवारात समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे आणि शासनाच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून उत्स्फूर्त स्वागत होत आहे.

# श्रीक्षेत्र ऋणमोचन यात्रा महोत्सवाची झाली सुरुवात



## हजारो अंध अपंग वृद्ध निराश्रीतांचा भरणार १८ ला कुंभमेळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८दर्यापूर–** श्री संत गाडगे महाराजांची कर्मभूमी असलेले श्री क्षेत्र ऋणमोचन येथील यात्रा महोत्सवाची सुरुवात झाली असून येत्या रविवारी तिसरा हप्ता असून १८ जानेवारीला पाचवा हप्ता म्हणजेच शेवटचा हप्ता असल्याने त्या दिवशी अंध अपंग निराश्रीत वृद्ध पुरुष, कुष्ठरोगी यांचा कुंभमेळा हा भरणार आहे हजारो लोकांची उपस्थिती मध्ये अन्नदान व वस्त्रदान व विविध साहित्य वाटप करण्यात येणार आहे त्यामध्ये प्रामुख्याने मूर्तिजापूर दर्यापूर अमरावतीच्या व्यापारी वर्गातर्फे निष्ठांना भोजनदान होणार आहे तसेच मुंबई अकोला अमरावती येथील व्यापारी वर्गातर्फे करण्यात येणार आहे याच कार्यक्रमाकरिता दि खामगाव अर्बन व बँक शाखा दर्यापूर च्या वतीने एक सुंदर पोस्टर प्रकाशित केल्यास त्याचे प्रकाशन श्री गाडगे महाराज ऋणमोचन संस्थेचे गजानन देशमुख, बँकेचे स्थानिक संचालक श्री किरण भाऊ उर्फ चिऊ भाऊ मोकासदार, शाखा व्यवस्थापक सारंग नंदाने, रमेश भले, बबन शेठ खंडेलवाल, दीपक चवणे, पत्रकार अमोल कंटाळे, व इतर कर्मचारी उपस्थित होते.


# 'मुख्यमंत्री, पालकमंत्र्यांना शब्द दिला; महापौर भाजपचाच होणार'

## आमदार रवी रानांनी केले स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**महापालिका निवडणुकीत भाजप मोठा भाऊ, तर युवा स्वाभिमान पक्ष लहान भाऊ अशी मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. अमरावतीत महापौर हा भाजपचाच होणार असा शब्द मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिला असून, तो प्रामाणिकपणे पाळणार आहे, अशी रोखठोक भूमिका युवा स्वाभिमान पक्षाचे सर्वेसर्वा आमदार रवी राणा यांनी मंगळवारी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केली.

आमदार रवी राणा यांच्या मते, भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष अमरावती महापालिका निवडणुकीत वेगवेगळे लढत आहे. असे असले तरी ज्या जागेवर भाजप उमेदवार कमकुवत आहे, अशा जागेवर युवा स्वाभिमानचा 'मजबूत' उमेदवार निवडून आणला जाईल. आणि ज्या जागी युवा स्वाभिमानचा उमेदवार कमकुवत आहे, तेथे भाजपच्या 'मजबूत' उमेदवाराला निवडून आणले जाईल, असा भाजप आणि 'वायएसपी'त वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीने मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय झाला आहे. कारण अमरावती भाजपच्या कोअर कमिटीने तिकीटवाटपात जो



काही गोंधळ केला आहे, यात निष्ठावंत आणि प्रामणिक कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्याची संतप्त भावना आहे. त्यामुळे भाजपच्या काही निष्ठावंतांना युवा स्वाभिमान पक्षाची उमेदवारी दिली असून, ते त्यांच्या प्रभागात सक्षम उमेदवार म्हणून मैदानात लढत आहे. निवडणूक अंतिम टप्प्यात असताना प्रभागात जे काही वास्तविक चित्र समोर येईल त्यानुसार भाजप आणि युवा स्वाभिमान संयुक्तपणे निर्णय घेत 'मजबूत' असलेल्या उमेदवाराला निवडून आणू, असेही आमदार रवी राणा म्हणाले.

### ही तर काळ्या दगडावरची रेघ

महापौर हा भारतीय जनता पक्षाचाच होईल, ही काळ्या दगडावरील रेघ आहे. हाच निकाल शहरात अपेक्षित आहे. त्याला कोणीही टाळू शकत नाही, असेही आ. रवि राणा म्हणाले. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर मैत्रीपूर्ण लढतीमुळे 'दोस्ती भी पक्की, जीत भी पक्की' हे भाजपच्या नेत्यांना प्रत्यक्षपणे दिसून येईल आणि त्यावर शिक्कामोर्तबही होईल, असा दावा आमदार राणा यांनी केला आहे.

### 'दोस्ती भी पक्की, जीत भी पक्की'

युवा स्वाभिमान पक्षाचे ३२ उमेदवार अमरावती महापालिका निवडणूक रिंगणात आहेत. भाजपने तिकीट वाटपात केलेल्या गोंधळामुळे भाजपशी मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय घेतला आहे. विरोधकांना गारद करणे हा 'वायएसपी'चा अजेंडा असल्याचे आमदार रवी राणा म्हणाले.

# हर्षवर्धन सपकाळांना मानसिक उपचाराची गरज

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची टिका

विदर्भ प्रजासत्ताक

**दि. ८अमरावती–** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा



नगर पालिका निवडणुकीतील कामगिरी बघता त्यांचे प्रदेशाध्यक्ष पद जाण्याची शक्यता आहे. पद वाचविण्यासाठी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरूद्ध बोलत असतात. त्यांना मानसिक उपचाराची गरज आहे, अशा शब्दात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी टिका केली. यापुढे सपकाळ जिथे अशाप्रकारचे वक्तव्य करतील त्या जिल्हयातील भाजपचे कार्यकर्ते त्यांची दखल घेतील असा इशाराही त्यांनी दिला.

महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमिवर भारतीय जनता पक्षाचा वचननामा बुधवारी पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सकाळी पत्रकार परिषदेतून मुख्यमंत्री फडणवीस आता देवाभाऊ नाही टक्काभाऊ झाले आहेत असा आरोप केला होता, त्यास प्रत्यूत्तर देत ते बोलत होते. बावनकुळे पुढे म्हणाले, सपकाळ यांच्या कार्यकाळात काँग्रेसची सर्वच ठीकाणी अधोगती होत आहे. नगर पालिका निवडणुकीत हा पक्ष सिंगल डिजीटवर आला आहे. त्यांची ही प्रगती बघता त्यांचे प्रदेशाध्यक्षपद काढून घेण्यात येणार असल्याचे संकेत आहेत. ते पद वाचविण्यासाठी सपकाळ टीका करीत आहेत. या टीकांचे व्हीडीओ ते राहूल गांधीना पाठवून खुष करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ते पुढे म्हणाले, वास्तविकतः त्यांची देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करण्याची लायकी नाही. त्यांची टीका म्हणजे सुर्यावर थूंकण्यासारखे आहे. यापुढे त्यांनी स्वतःला आवर घातला नाही तर ते ज्या जिल्हयात बोलतील तेथील भाजपचे कार्यकर्ते त्यांची दखल घेतील असा इशाराही त्यांनी दिला. पत्रकार परिषदेस खासदार अनिल बोंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, निवडणूक प्रभारी आमदार संजय कुटे, आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार केवलराम काळे, प्रवीण पोटे, शिवराय कुळकर्णी उपस्थित होते.

# अमरावती महानगरपालिकेत मतदार जनजागृतीसाठी सामाजिक संस्थांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती–**लोकशाही व्यवस्थेचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक पात्र मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मतदार जनजागृती संदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.ही बैठक बुधवार, दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता अमरावती महानगरपालिकेतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे संपन्न झाली. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती निर्माण करणे, मतदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे तसेच मतदानाच्या दिवशी १०० टक्के मतदानाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, या हेतूने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीस आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. आयुक्त महोदया यांनी आपल्या भाषणात लोकशाही प्रक्रियेत सामाजिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. सामाजिक संस्था समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचू शकतात आणि त्यामुळे मतदार जनजागृती मोहिमेत त्यांचा सहभाग निर्णायक ठरू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.बैठकीदरम्यान आगामी निवडणुकीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध मतदार जनजागृती उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सामाजिक संस्थांच्या माध्यमातून घराघरात मतदानाचा संदेश पोहोचवणे, नवमतदारांना मतदानासाठी प्रेरित करणे, महिलांमध्ये व युवकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार व वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचना मांडण्यात आल्या. या बैठकीत हॉटेल व्यवसायीक व इतर आस्थापनाधारकांनी मतदान जनजागृतीकरीता विशेष सुट जाहीर केल्या आहे. शनिवारी दिनांक १० जानेवारी,२०२६ रोजी मतदान जनजागृतीसाठी भव्य रॅली काढण्याचे नियोजित करण्यात आले. यावेळी उपस्थित सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी आपले अनुभव, राबविण्यात आलेले उपक्रम तसेच भविष्यात राबविता येणाऱ्या नाविन्यपूर्ण कल्पनांची माहिती दिली. मतदान जनजागृतीसाठी रॅली, जनसंवाद, पोस्टर-बॅनर, डिजिटल माध्यमांचा



वापर, तसेच प्रत्यक्ष संपर्क मोहिमा राबविण्याबाबत विविध सूचना मांडण्यात आल्या.या बैठकीतून मतदार जनजागृतीसाठी अनेक उपयुक्त व सकारात्मक सूचना पुढे आल्या असून, त्या आगामी निवडणुकीत प्रभावी ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सर्व सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे आणि समन्वयाने काम करून मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मा. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी केले.यावेळी महानगरपालिका आयुक्तांसह उपस्थितांनी मतदानाची शपथ घेतली.

महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी सूचना केल्या की, आगामी निवडणुकीत १०० टक्के मतदान हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून सर्व यंत्रणा व सामाजिक संस्थांनी समन्वयाने कार्य करावे. सामाजिक संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील घराघरात जाऊन मतदानाचे महत्व नागरिकांना समजावून सांगावे. नवमतदार, युवक, महिला तसेच ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांपर्यंत विशेष लक्ष देऊन जनजागृती उपक्रम राबवावेत. मतदानाचा हक्क बजावणे हे नागरिकांचे कर्तव्य असून त्याबाबत जनतेमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करावे. मतदान प्रक्रियेबाबत गैरसमज दूर करण्यासाठी प्रत्यक्ष संवाद, चर्चासत्रे व जनसंवाद कार्यक्रम आयोजित करावेत. डिजिटल माध्यमे, सामाजिक जाळी, पोस्टर, बॅनर व रॅली यांच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती करावी. मतदानाच्या दिवशी मतदारांना आवश्यक त्या मार्गदर्शन व सहकार्याची व्यवस्था करण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. सर्व उपक्रम निष्पक्ष, पारदर्शक व निवडणूक आचारसंहितेच्या चौकटीत राबविण्यात यावेत. या सूचनांच्या अंमलबजावणीमुळे मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल, असा विश्वास मा. आयुक्त महोदया यांनी व्यक्त केला. अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.




# अमरावती शहर सीसीटीव्हीच्या जाळ्यात आणणार– अमरावती महापालिकेचा महापौर भाजपचाच होणार

**महसूल मंत्री बावनकुळे विश्वास**

## अमरावतीचा भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष पूर्णपणे सज्ज असून, कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी संपूर्ण अमरावती शहर सीसीटीव्हीच्या जाळ्यात आणण्यात येणार आहे, अशी घोषणा महसूल मंत्री तथा भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.सुरुवातीला अमरावती महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा अधिकृत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.बावनकुळे म्हणाले की, अमरावतीच्या विकासासाठी राज्य सरकारकडून ११० कोटी रुपयांची विशेष आर्थिक तरतूद मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठोस मागणी करण्यात येणार आहे.शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारली जाणार असून, गुन्हेगारी व जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात अमरावतीसाठी ११० कोटी रुपयांची विशेष तरतूद मागणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

डबल इंजिन सरकार अमरावतीच्या विकासासाठी पूर्ण ताकदीने सोबत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा थेट लाभ अमरावतीकरांना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असून, सीसीटीव्ही प्रकल्पामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा आणि आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देणे शक्य होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अमरावतीला २०३० पर्यंत मुख्यालयाचे शहर म्हणून विकसित करण्याचा भाजपचा दीर्घकालीन दृष्टिकोन असून, यामध्ये पायाभूत सुविधा, स्मार्ट सिटी धर्तीवरील विकास, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व रोजगार निर्मितीला प्राधान्य दिले जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.कमळाची बटण म्हणजे विकसित अमरावतीची बटण आहे, असे सांगत त्यांनी अमरावती महापालिकेचा महापौर भाजपचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला. भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार विजयी करण्यासाठी पक्षाची संपूर्ण यंत्रणा कामाला लागली असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी त्यांनी पक्षातील शिस्तीवर ठाम भूमिका मांडत सांगितले की, भाजपच्या अधिकृत उमेदवारांव्यतिरिक्त इतर कोणाचाही प्रचार करणे अथवा कमळ चिन्हाविरोधात भूमिका घेणे हे पक्षाला मान्य नाही. भाजपच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकसंघ राहून अधिकृत उमेदवारांच्या विजयासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.भाजप नेत्या नवनीत राणा यांच्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, त्यांनी भाजपच्या कमळ चिन्हाचा प्रचार करावा, ही पक्षाची अपेक्षा आहे. भाजपचा विजय आणि अमरावतीचा विकास हेच आमचे ध्येय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.अमरावतीला विकसित शहर बनविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०४७ च्या महाराष्ट्राचे दीर्घकालीन व्हिजन तयार केले असून, त्या अनुषंगाने विकसित अमरावतीचा संकल्प करण्यात आला आहे. भविष्यातील लोकसंख्या लक्षात घेऊन रस्ते, वीज, पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण यासह सर्व मूलभूत सुविधांचे नियोजन करण्यात आले असल्याचे बावनकुळे म्हणाले.शहरातील १५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी



बांधलेल्या पण तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणीत आलेल्या घरांना दिलासा देण्यासाठी कायदा शिथिल करण्यात आला असून, संबंधित घरांना प्रॉपर्टी कार्ड व नियमितीकरण दिले जाईल. तसेच शासकीय जागेवरील रहिवासी अतिक्रमणधारकांना पट्टे देऊन प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.भाड्याने राहणाऱ्या नागरिकांसाठी म्हाडाच्या माध्यमातून घरे, तर शासकीय व महानगरपालिकेच्या जागांचा एमएसआरडीसीच्या सहकार्याने विकास करून मॉल, पार्किंग, शाळा व उद्याने उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.नेहरू मैदानाचे ऐतिहासिक स्वरूप कायम ठेवून त्याचा विकास केला जाईल, तसेच उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीसाठी महारेलसोबत करार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. अमरावतीत आयटी पार्क उभारून स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे, आधुनिक कचरा व्यवस्थापन, भुयारी गटार योजना, छत्री तलाव व चिखलदरा पर्यटन विकास, अंबादेवी व एकवीरा मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास आदी महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम करण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.डबल इंजिन सरकार अमरावतीच्या पाठीशी असून, भाजपला बहुमत दिल्यास शहराचा झपाट्याने विकास केला जाईल, असा विश्वास व्यक्त करत कमळाची बटन हीच विकसित अमरावतीची बटन आहे, असे ते म्हणाले.:आमची कमळाची बटन ही विकसित अमरावतीची बटन आहे. मी कोणाच्या विरोधात बोलण्याकरता आलो नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री निर्तीन गडकरी आणि मी आणि पक्षाचे जबाबदार पदाधिकारी असताना आज विकासाचे दार उघडण्याचे दिवस आले आहेत आणि अमरावतीच्या विकासाचे हे पाच वर्ष राहणार आहे. २०२९ ची अमरावती ही डिव्हिजन असलेली असेल आणि डिव्हिजनचे शहर म्हणून अमरावती शहर आहे, अमरावती मध्ये भारतीय जनता पार्टीचाच महापौर बनेल अशी मला विश्वास आहे.अमरावती जर विकसित महाराष्ट्राच्या पाठीमागे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या सोबत राहिली तर आम्ही चांगले काम करू शकणार आहे शेवटी जनतेनेच आम्हाला आशीर्वाद द्यायचे आहे.. आम्ही जनतेच्या मताच कर्ज घेतले आहे. इमानदारीने काम करून जनतेचा अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करू असेही बावनकुळे म्हणाले.भारतीय जनता पार्टीच्या चिन्हावर असलेले सर्व उमेदवार बहुमताने विजयी करणे ही आमची जबाबदारी आहे. कोण काय बोलतो ,कोण निवडणुका जिंकण्याकरता कोणाचं नाव वापरतात यावरती आम्हाला काही बोलायचे नाही आणि त्याला अर्थ नाही .शेवटी भारतीय जनता पार्टीचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते एक संघ राहून भारतीय जनता पार्टीच कशी निवडून येणार आहे यासाठी प्रयत्न करणार आहोत.. त्यामुळे कोण काय बोलत या यामध्ये मी जास्त पडणार नाही असेही बावनकुळे म्हणाले.मतदान हे कर्ज असून ते घेऊन पळून जाण्याची भाजपची भूमिका नाही, तर पुढील पाच वर्षे अमरावतीच्या जनतेच्या आशा-अपेक्षा, सुरक्षा व सुरक्षिततेची जबाबदारी पक्ष प्रामाणिकपणे पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.अमरावती महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचा महापौर निवडून आणण्यासाठी शहरातील नागरिकांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

## बहुतेक नगरपालिकांच्या पहिल्या बैठका १३ ला

### चिखलदरा १२, वरुड १४, तर अचलपूरची सभा १५ जानेवारीला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती–**

जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या आहेत. यानंतर उपाध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून २५ दिवसांच्या आत ही प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे बहुतेक नगरपालिकांनी १३ जानेवारी रोजी पहिल्या बैठकीचा मुहूर्त साधला आहे.

या बैठकांमध्ये चिखलदरा नगरपालिकेत १२ जानेवारीला, वरुड नगरपालिकेत १४ जानेवारीला, तर जिल्ह्यातील सर्वात मोठ्या ४१ सदस्यीय अचलपूर नगरपालिकेत १५ जानेवारी रोजी पहिली सभा होणार आहे. चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, धारणी, धामणगाव रेल्वे, मोर्शी, नांदगाव खंडेश्वर आणि शेंदुरजना घाट येथील सभा १३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत. अंजनगाव सुर्जी येथील सभेची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. नगरपालिकांची पहिली सभा ही सभागृहातील सदस्य आणि नगराध्यक्ष यांच्या कार्यकाळाची सुरुवात असते, त्यामुळे तिला विशेष महत्त्व आहे. याच सभेत स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्याची संधी असल्याने राजकीयदृष्ट्याही या बैठकींबाबत उत्सुकता आहे. सर्व सभांचे अध्यक्षस्थान नगराध्यक्ष भूषवणार असून, त्यांच्याच स्वाक्षरीने सभेच्या



नोटीस काढण्यात आल्या आहेत.दरम्यान, दर्यापूर नगरपालिकेची पहिली सभा ९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त डॉ. विकास खंडारे हे या नगरपालिकेचे मुख्याधिकारी आहेत. त्यांच्या देखरेखीखाली आणि नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडेल.

पहिल्या सभेत उपाध्यक्षांसोबतच स्वीकृत सदस्यांचीही निवड केली जाते. उपाध्यक्षांची निवड बहुमतावर आधारित असल्याने ज्या पक्षाकडे बहुमत आहे, तेथे ही निवड सहज होईल. मात्र, स्वीकृत सदस्यांची निवड संख्याबळानुसार केली जाते. यासाठी अनेक नगरपालिकांमधील अपक्षांना सोबत घेऊन पक्षीय नगरसेवकांनी गट तयार केले आहेत आणि त्यांना जिल्हाधिकाऱ्यांची मान्यताही मिळवली आहे.

अशा प्रकारे स्वतःच्या पक्षाचे संख्याबळ वाढवून स्वीकृत सदस्य निवडून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या या गटांबाबत कमालीची गोपनीयता राखली जात आहे.

## बावनकुळे यांच्या प्रचार सभेत बंडखोरांनी घातला गोंधळ!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८चंद्रपूर –** महानगर पालिका निवडणुकीतील भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी बुधवार, ७ जानेवारी रोजी चंद्रपूर येथे तीन वेगवेळ्या ठिकाणी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सभा होत्या. त्यातील दोन सभेत भाजपाकडून उमेदवारी न मिळालेल्या बंडखोरांनी गोंधळ घातला. सपना टॉकीज चौकातील सभेत तर बावनकुळे यांचे भाषण सुरू असतानाच बंडखोर राकेश बोमनवार हे मंचावरर चढले. परिस्थितीचे गांभीर्य पाहून आ. किशोर जोरगेवार यांनी त्यांना मंचाखाली नेले.



अचानक मंचावर चढलेल्या बंडखोर राकेश बोमनवार यांनी मंचावरून आपल्याला बोलू द्यावे अशी मागणी केली. शेवटी खाली उरवून कार्यकर्त्यांना त्यांना हाकलून लावले. तर दुसर्या सभेत सभागृहाबाहेर ‘एबी फार्म चोर’, ‘२०० युनिट चोर’ अशा घोषणा देऊन बंडखोरांनी आपला रोष व्यक्त केला.

सकाळी ११ वाजता जटपूरा गेट प्रभागाच्या उमेदवार छबू वैरागडे, रवी लोणकर यांच्यासह इतर उमेदवारांच्या प्रचारासाठी बावनकुळे यांची जाहीर सभा सपना टॉकीज चौकात सुरू होती. बावनकुळे यांचे भाषण सुरू असतानच, या प्रभागातून भाजपाची उमेदवारी न मिळाल्यामुळे बंडखोरी करणारे अपक्ष उमेदवार राकेश बोमनवार यांनी थेट मंचावर चढले. अपक्ष उमेदवार मंचावर आल्याचे बघून आमदार किशोर जोरगेवार यांनी त्यांना तिथेच थांबविले. मात्र, बोमनवार यांनी बावणकुळे यांच्याशी बोलायचे आहे असे सांगितले. तेव्हा आमदार जोरगेवार यांनी बोमनवार याचा हात पकडून खाली उतरविले. त्यामुळे सभेत काही काळ व्यत्यय निर्माण झाला होता. कार्यकर्त्यांनी बोमनवार यांना मंचाच्या मागे नेत धक्काबुक्की केली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर वाद मिटला.

**इंदिरा नगर येथे सभास्थळी घोषणाबाजी–** सायंकाळी इंदिरा नगर येथे बावनकुळे यांची सभा होती. त्यावेळीही बावनकुळे यांचे भाषण सुरू असताना नाराज भाजपा कार्यकर्ता मनोज पोतराजे याने आपल्या समर्थकांसह मंडपात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला व ‘एबी फार्म चोर’ आणि ‘२०० युनिट चोर है’ अशा घोषणा देवून गोंधळ घातला. एकीकडे बावनकुळे यांचे भाषण सुरू असतानाच या घोषणा सुरू झाल्याने तेक्षे तणावाची स्थिती निर्माण झाली होती. विशेष म्हणजे, बावनकुळे यांना या घोषणाबाजीमुळे तिथून परतताना वाहनाचा मार्ग बदलावा लागला.

## भाजपची डोकेदुखी! नवनीत राणांचा युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना पाठिंबा; अखेर खासदार बोंडेंचा खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना राजकारणातील वेगवेगळे रंग देखील अनुभवायला मिळत आहेत. भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी साईनगर प्रभागातील भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांच्या विरोधातील युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार सचिन भेंडे यांना उघडपणे पाठिंबा दिल्यानंतर आता त्यांनी विलासनगर-मोरबाग प्रभागातील युवा स्वाभिमान पक्षाच्या एका उमदेवाराच्या प्रचारार्थ सभा घेतल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. अखेर भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांना यांसदर्भात खुलासा करावा लागला आहे.

विलासनगर प्रभागाच्या ड जागेवरील भाजपचे उमेदवार राजेश साहू यांच्या ऐवजी युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार दीपक साहू सम्राट यांना निवडून आणण्याचे आवाहन





नवनीत राणा यांनी आमदार रवी राणा यांच्या उपस्थितीत केले. दुसरीकडे, त्यांनी याच प्रभागातील भाजपच्या इतर तीन उमेदवारांना निवडून आणा असेही सांगितले. विशेष म्हणजे हे उमेदवारही युवा स्वाभिमान पक्षाच्या मंचावर उपस्थित होते. प्रभागातील भाजपच्या एका उमेदवाराला विरोध करण्याचे राजकारण काय, अशी चर्चा त्यानंतर सुरू झाली. याला लोकसभा निवडणुकीची पार्श्वभूमी असल्याचे सांगितले जात आहे. आपल्याला पराभूत करण्यासाठी कारणीभूत ठरलेल्यांना धडा शिकवा, असा नाराच नवनीत राणा यांनी दिला आहे.

### मतदारांनी संभ्रमित होऊ नये- डॉ. अनिल बोंडे

नवनीत राणा यांनी विलासनगर-मोरबाग प्रभागात प्रचार सभेदरम्यान आणि त्यानंतर जो प्रकार केला, तो भाजपच्या कार्यकर्त्यांना व्यथित करणारा असला, तरी आपण सर्वांनी संभ्रमित होऊ नये. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संमतीने उमेदवारी देण्यात आली, हे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्वांनी हिदुत्वासाठी, अमरावतीच्या विकासासाठी भाजपच्या उमेदवारांना मतदान करायचे आहे, असे आवाहन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.

डॉ. बोंडे म्हणाले, हा प्रभाग हिंदुत्वाचा गड आहे. या ठिकाणी चार जागांवर भाजपचे उमेदवार आहेत. त्यामुळे या ठिकाणी उमेदवारांविषयी संभ्रमित करणे हे चुकीचे आहे. या चारही लोकांनी लोकसभा निवडणुकीमध्ये संपूर्ण ताकदीने भाजपचे काम केले आहे. म्हणून त्यांना गद्दार म्हणणे, एखाद्या समाजाला दोषी ठरवणे, अत्यंत दुःखदायक आहे. कुणी काहीही म्हणो. भाजपमध्ये फूट पाडू नका. हिदुत्वामध्ये फूट पडायला नको. एखाद्याचा चेहरा कुणाला आवडत नसेल, तर तो त्याचा प्रश्न आहे. पण, जिथे कमळ असेल, तो आपला उमेदवार आहे, त्याच्या पाठीशी उभे रहा, असे आवाहन बोंडे यांनी केले आहे.

## संक्रांत, पतंगाचे नाते घट्ट जुळलेले

### खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी , साहित्यांनी सजल्या बाजारपेठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती–**

संक्रांत आणि तिळगुळाचे नाते जितके घट्ट आहे तितकेच घट्ट नाते संक्रांत आणि पतंगाचे आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत प्रत्येकजणाला पतंगाबाबत आकर्षण असते. अवघ्या काही दिवसांवर ‘मकर संक्रात’ आल्याने त्यानिमित्त लागणाऱ्या वस्तू, साहित्यांनी बाजारपेठा सजल्या आहेत. मकर संक्रांती आणि पतंग असे समीकरण असल्याने बाजारात वेगवेगळ्या आकार, रंगांचे पतंग आणि त्याला लागणारे धागे दिसू लागले आहेत. मागील वर्षीच्या तूलनेत पतंग आणि मांज्याच्या किमतीत १० ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे.

मकर संक्रांतीला सात दिवस शिल्लक असताना अनेकांनी पतंग घेतले. गल्लीतील, कॉलनीतील मुलांनी पतंग आणलेला पाहून अनेक मुलांनी आई-बाबांकडे हट्ट करून पतंग खरेदी केली. विशेष करून रंगीबेरंगी पतंग खरेदी न करता पबजी, स्पायडरमॅन, छोटा भीम, डोरेमॉन, अँग्री बर्ड, सुपरमॅन या पतंगांची लहान मुलांकडून मागणी



होती. लाकडी फिरक्यांसह मुलांसाठी लहान प्लास्टिकच्या फिरक्याही खरेदी केल्या. बाजारात नायलॉनच्या मांजासह प्लास्टिकबंदीमुळे यंदा पॉलिथीनचे पतंगही दिसेनासे झाले आहेत. शाळांना सुट्टी असल्यामुळे सायंकाळी पतंग उंचच्या उंच उडविणारी मंडळी, पतंग उडविताना अधूनमधून तिळगुळाचे लाडू तोंडात टाकणे, काटलेला पतंग खाली पडताच ती पकडण्यासाठी मुलांची होणारी धावपळ हे चित्र ठिकठिकाणी दिसले. पतंग खरेदीसाठी बाजारपेठा फुललेल्या दिसत आहेत. तर सकाळी, सायंकाळी शहरातील मोकळ्या मैदानावर तसेच इमारतींच्या गच्चीवर पतंग उडविण्यासाठी नागरिक दिसून येत आहे.

# अकोल्याच्या संघाने पटकाविले स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे सांघिक विजेतेपद

## आदित्य टोळे ,रितेश तिवारी, कौस्तुभ पाचडे वैयक्तिक पुरस्काराचे मानकरी स्व. माणिकराव घवळे स्मृती वादविवाद स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे मोठ्या उत्साहात पार पडलेल्या स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे सांघिक पारितोषिक यावर्षी अकोला येथील राधादेवी गोयंक महिला महाविद्यालयाच्या संघाने पटकाविले. आदित्य टोळे,रितेश तिवारी, कौस्तुभ पाचडे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवून पुरस्कार प्राप्त केले.शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ जयंती निमित्ताने आयोजित स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचा यावर्षीचा विषय भारताच्या विकासामध्ये तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत हा होता. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपले वैचारिक सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.डॉ पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय आणि स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २४ व्या राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख, प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, प्रा. डॉ. महेंद्र मेटे, परीक्षक प्रा.डॉ.स्वप्नील इंगोले, प्रा.डॉ.एकनाथराव तट्टे, प्रा.मॅझनी बायदनी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय अकोला येथील वैष्णवी पागृत, अंकिता कांगदे यांच्या संघाने पटकाविले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते फिरता चषक ११ हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे प्रथम वैयक्तिक पुरस्कार आर.डी.आय. के महाविद्यालय बडनेरा येथील आदित्य टोळ यांनी पटकाविले. त्याला रोख रक्कम ७०००,स्मृतीचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांनी सन्मानित केले. नागपूर येथील रितेश तिवारी याला रोख रक्कम ५०००, ग्रंथ, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन द्वितीय पुरस्काराने गौरविण्यात आले. स्पर्धेचे तृतीय क्रमांकाचे बक्षीस डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा कौस्तुभ पाचडे याला देण्यात आले. रोख ३०००, स्मृतीचिन्ह,ग्रंथ आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यासोबतच या स्पर्धेत विशाल खर्चवाल नागपूर, पूर्वा मानकर शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती, शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती ची पृथा देशमुख, सिपना अभियांत्रिकी बडनेरा ची विद्यार्थिनी श्रावणी रोठे, मुंबई विद्यापीठ येथील सिद्धार्थ साठे, नागपूर विद्यापीठाचा ओम ढोक, भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील पार्वती आरशिया, आणि श्री.शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती चा सौरभ वैद्य यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.बक्षीस वितरण समारंभाचे संचालन प्रा.रत्नाकर शिरसाठ व मयूर चौधरी,प्रास्ताविक प्रफुल्ल घवळे,आभार प्रदर्शन प्रा.डॉ.शितल तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा.डॉ.अमित गावंडे, वैशाली गरकळ (घवळे), प्रा.रणजीत देशमुख, विजय देशमुख, निलेश वानखडे, प्रवीण मिसाळ, प्रा संदिप वानखडे,प्रकाश अवझाड, नरेंद्र जवंजाळ, उमेश पवार, यश इंगोले यांच्यासह डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. संपूर्ण स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदूरकर व डॉ.महेंद्र मेटे यांनी काम पाहिले तर प्रा.डॉ.स्वप्नील इंगोले, प्रा . डॉ.एकनाथराव तट्टे, प्रा.मॅजनी बायदनी यांनी यशस्वीरित्या परीक्षणाची जबाबदारी सांभाळली.

**तरुणाईंमध्ये बदल घडविण्याची क्षमता**

आज समाजासमोर अनेक ज्वलंत विषय उभे आहेत–शिक्षण, बेरोजगारी, पर्यावरण, भ्रष्टाचार, सामाजिक विषमता. या प्रश्नांवर गप्प बसणे म्हणजे अन्यायाला साथ देणे होय. म्हणूनच तरुणांनी आता केवळ पाहणारे न राहता बोलते, विचार करते आणि कृती करते झाले पाहिजे.तरुणाईकडे ऊर्जा आहे, विचारांची ताकद आहे आणि बदल घडवण्याची क्षमता आहे. सोशल मीडियावर मत मांडण्यापलीकडे जाऊन संवाद, चर्चा आणि सकारात्मक कृती करणे गरजेचे आहे. असे मत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले यांनी व्यक्त केले.

# क्यूआर कोडद्वारे मतदार यादीतील नाव व मतदान केंद्र शोधणे झाले अधिक सुलभ

## स्वीप उपक्रमांतर्गत अमरावती महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते क्यूआर कोडचे उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती शहरातील लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा तसेच आगामी अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी लक्षणीयरीत्या वाढावी, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने विविध नाविन्यपूर्ण व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या मालिकेत स्वीप (Systematic Voters' Education and Electoral Participation) कार्यक्रमांतर्गत एक महत्त्वपूर्ण व तंत्रज्ञानाधारित पाऊल उचलण्यात आले असून, नागरिकांना मतदार यादीतील आपले नाव तसेच मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध व्हावी याकरिता विशेष टठ कोड विकसित करण्यात आला आहे.सदर टठ कोडचे उद्घाटन नुकतेच अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून, कोणत्याही मतदाराला माहितीअभावी मतदानापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.

**शहरातील विविध ठिकाणी टठ कोड उपलब्ध**

नागरिकांना या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा, याकरिता शहरातील गर्दीची ठिकाणे, बाजारपेठा, व्यापारी संकुले, शासकीय व खासगी दवाखाने, मंदिरे, सार्वजनिक ठिकाणे तसेच नागरिकांची नियमित वर्दळ असलेल्या परिसरात हे टठ कोड लावण्यात आले आहेत. नागरिक केवळ मोबाईलद्वारे टठ कोड स्कॅन करून काही क्षणांतच मतदार यादीतील आपले नाव, मतदार क्रमांक व संबंधित मतदान केंद्राची संपूर्ण माहिती मिळवू शकणार आहेत.

**मतदान केंद्रांतील बदलांमुळे होणारी गैरसोय टळणार**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत अमरावती महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदारसंख्येत वाढ झालेली आहे. त्यानुसार काही मतदान केंद्रांमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत. या बदलांमुळे मतदानाच्या दिवशी मतदारांची गोंधळ, गैरसोय किंवा वेळेची नासाडी होऊ नये, यासाठी टठ कोड सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.या माध्यमातून मतदारांना निवडणुकीपूर्वीच आपले मतदान केंद्र कुठे आहे, याची अचूक माहिती मिळणार असून मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने व वेळेत मतदान करता येणार आहे.

**मतदानाची टक्केवारी वाढविण्यास मदत**


टठ कोडद्वारे मिळणारी सोपी, जलद व पारदर्शक माहिती ही मतदारांसाठी मोठी सुविधा ठरणार असून, यामुळे नागरिकांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. विशेषतः युवक, ज्येष्ठ नागरिक व पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या मतदारांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**अधिकाधिक नागरिकांनी क्यूआर कोडचा वापर करण्याचे आवाहन**

या उपक्रमाचा लाभ शहरातील प्रत्येक मतदाराने घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक असून, महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या टठ कोड सुविधेचा जास्तीत जास्त वापर करून प्रत्येक पात्र नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे त्यांनी नमूद केले.अमरावती महानगरपालिकेचा हा अभिनव उपक्रम आगामी निवडणुकांमध्ये मतदारांसाठी मार्गदर्शक ठरून मतदानाची टक्केवारी वाढविण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# राज्यातील 'झेडपी' च्या १२ हजारावर शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचा मुहूर्त गवसला

## शिक्षक भरती पूर्वीच आंतरजिल्हा बदली प्रक्रिया




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शिक्षक संवर्गाची मागील तीन वर्षापासून रखडलेली आंतर जिल्हा बदली प्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात यावी अन्यथा प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने मुंबई आझाद मैदानावर प्रखर आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे राज्य अध्यक्ष महेश ठाकरे यांनी ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे व ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांना दिला होता.

प्रहार शिक्षक संघटनेच्या निवेदनाची दखल घेत अखेर ग्रामविकास विभाग ऍक्टिव्ह मोडवर आला असून मागील तीन वर्षापासून रखडलेली आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा सातवा टप्पा लवकरच सुरू होणार आहे. याबाबत प्रधान सचिव यांनी महाराष्ट्रातील सर्व शिक्षणाधिकारी यांचे सोबत ६ जानेवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता व्हीसीद्वारे बैठक घेऊन सूचना निर्गमित केल्या आहेत.

**या होत्या मागण्या**

आंतरजिल्हा बदलीचा सातवा टप्पा कार्यान्वित करण्यापूर्वी सर्व जिल्हा परिषदांना शिक्षक संवर्गाचे रोस्टर अद्यावत करण्याच्या काल मर्यादित सूचना द्याव्यात,पेसा क्षेत्रातील जिल्ह्यात शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रात २०% व नॉन-पेसा क्षेत्रात ८० टक्के रिक्त पदे आंतरजिल्हा बदली प्रक्रिया करिता उपलब्ध करून देण्यात यावी,आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत उर्दू माध्यमाच्या शिक्षकांना आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे शिक्षक भरती प्रमाणे खुल्या प्रवर्गाकरिता परावर्तित करण्यात यावी,आंतरजिल्हा बदली प्रक्रिया करिता ३१ मे २०२६ अखेर पर्यंतचे रिक्त पदे गृहीत धरण्यात यावी,आंतरजिल्हा बदली प्रक्रिया करिता स्वतंत्र वेळापत्रक निर्गमित करण्यात यावे,आंतरजिल्हा बदली प्रक्रिया ही शिक्षक भरती पूर्वी राबविण्यात यावी,काही जिल्ह्यांमध्ये विशिष्ट प्रवर्गाच्या जागा उपलब्ध नसल्यास तेथे शून्य बिंदू नामावली गृहीत धरून अशा शिक्षकांच्या स्वगृही बदल्या करण्यात याव्यात.

या प्रमुख मागण्या निवेदनातून ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे, शिक्षण मंत्री नामदार दादाजी भुसे व ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या समक्ष सादर करण्यात आल्या होत्या.अखेर या मागण्यांची सकारात्मक दखल घेत ग्रामविकास विभागाने आंतरजिल्हा बदली प्रक्रिये करिता कार्यवाही सुरू केली आहे.संच मान्यता पूर्ण होतात, ३१ मे अखेर पर्यंतची रिक्त पदे प्रथम आंतरजिल्हा बदली करिता उपलब्ध करून देण्यात येणार असून यानंतरच शिक्षक भरती प्रक्रिया सुरू होणार आहे.

# तिवसा येथे प्रशस्त पत्रकार भवन उभारण्यासाठी कटिबद्ध - आमदार राजेश वानखडे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८तिवसा**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने तिवसा येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार राजेश वानखडे यांनी भारतीय पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा गौरव करत पत्रकारिता ही समाजाभिमुख असावी आणि लेखणीला कोणताही डाग लागू नये, असे प्रतिपादन केले. तसेच तिवसा येथे प्रशस्त व सुसज्ज पत्रकार भवन उभारण्यासाठी आपण निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी जाहीर केले.यादव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीपप्रज्वलन करून आचार्य जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांची उपस्थिती होती.यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ बायस्कर यांचा सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाई भूषण यावले यांनी केले, सूत्रसंचालन कु. वैष्णवी काजळकर यांनी केले तर आभार अमोल खाकसे यांनी मानले.यावेळी तालुक्यातीलपदाधिकारी जानराव मनोहर, धनराज बारबुदे, शरद कांडलकर, ज्ञानेश्वर बेलूरकर, अभिजीत देशमुख, चंद्रकांत निमकर, सुनील भारती, सुनील घोरमाडे, प्रशिक शापामोहन, पप्पू मकेश्वर, डॉ. मेघराज कोचर, नंदकुमार मते, सुनील बोके, अजीज भाई, आशिष देशमुख, जगदीश चतुर, आकाश मकेश्वर आदी यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे जिल्हाध्यक्ष भाई भूषण यावले यांनी केले. सूत्रसंचालन कु. वैष्णवी काजळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार अमोल खाकसे यांनी केले.

# जसापूरवासीयांनी गजानन वारीतून दिला एकात्मतेचा संदेश




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८जसापूर (भडांगे)**

जसापूर (भडांगे) येथून श्रीक्षेत्र शेगावकडे निघालेल्या गजानन माऊली पालखी पायदळ वारीतून जसापूरवासीयांनी सामाजिक एकात्मतेचा प्रभावी संदेश दिला आहे. गावगाड्याच्या संस्कृतीचे जतन करत जाती-धर्मांच्या पलीकडे भक्तीचा जागर या वारीतून करण्यात आला. संपूर्ण गाव सडा-सारवण, आकर्षक रांगोळ्या आणि जय गजानन माऊलीच्या जयघोषाने भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले.श्री संत भैय्याजी महाराज जसापूर (भडांगे) ते श्रीक्षेत्र शेगाव अशी ही पवित्र पालखी पायदळ वारी बुधवारी (दि.७) भक्तिभावपूर्ण वातावरणात रवाना झाली. ह.भ.प. रामकृष्ण महाराज अकोटकर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच ह.भ.प. धनेश महाराज ढोके व ह.भ.प. प्रदीप रोडे महाराज यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडत आहे. ही दिंडी ११ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे पोहोचणार असून तेथे पालखी सोहळ्याचा समारोप होणार आहे.वारीच्या प्रारंभी गावातील मंदिरात पालखीची विधीवत पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक घरासमोर पालखीचे पूजन करण्यात येत होते. टाळ-मृदंगाच्या गजरात, पावल्या खेळत भाविक वारीत सहभागी झाले होते.या पालखी सोहळ्यात जसापूर (भडांगे)सह नायगाव, भांबोरा, आराळा आदी गावांतील असंख्य गजानन भक्त सहभागी झाले आहेत. गेल्या सात वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली ही वारी भक्ती, एकता व सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरत असून परिसरातील भाविकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# मोर्शी पोलिसांची अवैध गांजाविक्रीवर कारवाई; २४५ ग्रॅम गांजा जप्त


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मोर्शी**

मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध गांजा (कॅनाबीस) विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध मोर्शी पोलिसांनी कारवाई करत २४५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुंगीकारक औषधीद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे निर्देश



दिल्यानुसार गुन्हे प्रगटीकरण पथकाने ७ जानेवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. काजीपुरा, मोर्शी येथील आमद खान बिस्मिल्ला खान (वय ८५) यांच्या घराची राजपत्रित अधिकारी चारुदत्त पाटील (नायब तहसीलदार) व पंचांच्या उपस्थितीत झडती घेण्यात आली.झडतीदरम्यान आरोपीकडे विक्रीसाठी ठेवलेला गांजा आढळून आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला उत्साहात प्रारंभ; ३ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला गुरुवारी (दि.८) अमरावती येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर रंगतदार सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा महाकुंभात ग्रामीण भागातील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असून संपूर्ण परिसरात क्रीडा व संस्कृतीचा उत्साह पाहायला मिळत आहे.उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उत्तम व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा योग्य उपयोग करून क्रीडा, कला व शिक्षणात यश मिळवावे. खेळामुळे शिस्त, नेतृत्वगुण, संघभावना आणि चिकाटी वाढून व्यक्तिमत्त्व घडते. मिशन स्कॉलरशिप व निपुण महाराष्ट्रमध्येही विद्यार्थ्यांनी यशस्वी कामगिरी करावी, असे आवाहन त्यांनी केले.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक शिक्षणाधिकारी सतीश मुगल होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस, बाळासाहेब रायबोले यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक उपशिक्षणाधिकारी गंगाधर मोहने यांनी केले.महोत्सवात 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत सुरवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला राजस्थानी संस्कृतीवरील पेपट शो विशेष आकर्षण ठरला. तसेच चिंचोना शाळेच्या विद्यार्थ्यांचे मल्लखांब प्रात्यक्षिक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होते.यावेळी लांबउडीमध्ये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर यश मिळविणाऱ्या धारणी येथील दुर्गा कास्देकर हिचा विशेष गौरव करण्यात आला. क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक भावना वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.




# नाराज इच्छुकांची मनधरणी करताना उमेदवारांची दमछाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी वाटपामुळे काँग्रेस आणि भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांमध्ये निर्माण झालेली नाराजी दूर करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी पुढाकार घेतला आहे. पक्षांतर्गत मतभेद कमी करण्यासाठी व्यापक स्तरावर मनधरणीचे प्रयत्न सुरू आहेत. उमेदवारी न मिळाल्यामुळे काही इच्छुक नाराज आहेत, त्यामुळे त्यांना प्रचारात सक्रिय करताना उमेदवारांची दमछाक होत आहे.

भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस पक्षात उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या इच्छुकांची बैठक घेऊन पक्ष निरीक्षक समजूत काढत आहेत. पण, उमेदवारीसाठी इच्छुकांची नाराजी दूर होत नसल्याचे दिसत आहे. खासदार विशाल पाटील यांनी भाजपच्या नाराजांना काँग्रेसमध्ये खेचून शहरात पक्ष मजबूत करण्याला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे.

**नेत्यांकडून समजूत**

काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांमध्ये तिकीट न मिळाल्याने काही काळ नाराज असलेले इच्छुक आता नेत्यांच्या समजुतीनंतर पुन्हा प्रचारात सक्रिय होतील का, की निवडणुकीपासून दूर राहतील, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मात्र, वरिष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपामुळे महापालिका निवडणुकीत पक्षांतर्गत संघर्ष कमी होऊन प्रचाराला वेग येण्याची शक्यता आहे. ज्यांची नाराजी दूर झाली नाही, असे कार्यकर्ते आपल्या विरोधात प्रचार करणार का? अशी भीती उमेदवारांना आहे.

# ज्याला हरवलं, त्याच्यासाठीच मैदानात भाजपच्या निर्णयाने माजी नगरसेवक अडचणीत

## प्रभागातील अजब राजकारणाने कार्यकर्त्यांत संभ्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता तर कुठे युतीमधील जागावाटप असे निकष लावून अनेक भाजपाच्या उमेदवारांची तिकीटे कापण्यात आली आहेत. मात्र, अमरावतीत चक्क काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेल्या उमेदवाराला तिकीट देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे ज्या प्रभागामध्ये भाजपाच्या उमेदवाराकडून पराभव झाला होता, त्या ठिकाणीच पूर्वीश्रमीचा काँग्रेस कार्यकर्ता भाजपाकडून कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार आहे.

अमरावती महापालिका निवडणुकीत भाजपच्या उमेदवारी निवड संदर्भात झालेल्या निर्णयामुळे अनेक ठिकाणी गोंधळ उडालाय. शहरातील आंबापेठ प्रभागात २०१७ च्या निवडणुकीत सुमारे ३ हजार मतांच्या फरकानं विजयी झालेले भाजपाचे माजी नगरसेवक अजय सारसकर यांची यावेळी उमेदवारी कापण्यात आली. विशेष म्हणजे ज्या काँग्रेस उमेदवाराचा त्यांनी मागील निवडणुकीत पराभव केला होता, त्याच उमेदवाराला भाजपानं उमेदवारी दिली. आता आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करा, असे आदेश देऊन भाजपानं अजय



सारसकर यांची गोची केल्यानं प्रभागात चर्चांना उधाण आलंय.२०१७ मध्ये अंबापेठ गोरक्षण प्रभागात 'अ' गटात अजय सरसकर, 'ब' गटात लविना हर्षे, 'क' गटात स्वाती कुलकर्णी , 'ड' गटात प्रणित सोनी हे भाजपाचे उमेदवार होते. यावेळी अजय सरसकर वगळता मागे निवडून आलेल्या सर्व उमेदवारांना पुन्हा संधी देण्यात आली. विशेष म्हणजे मागील निवडणुकीत अजय सरसकर यांना ६ हजार १६७ मतं मिळाली होती. तर त्यांच्या विरोधात असणारे काँग्रेसमध्ये असताना मिलिंद बांबल यांना ३ हजार ६२० मतं मिळाली होती. काँग्रेसमध्ये पराभव झाल्यावर आता काही वर्षांपूर्वी मिलिंद बांबल यांनी भाजपात प्रवेश घेतला. भाजपानं त्यांना उमेदवारी दिली. भाजपाचा हा निर्णय अजय सरसकर यांच्यावर अन्याय करणारा असल्याचा सूर पक्षातूनच उमटतोय.भाजपा माझ्या रक्तात आहे. मी युवा मोर्चाचा अध्यक्ष असताना प्रामाणिक काम केलंय. मात्र, त्या उमेदवाराला मी मागील निवडणुकीत पराभूत केलं. काँग्रेसमध्ये असताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेकदा टीका केली. त्याच उमेदवारासाठी मला काम करावं लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली. विचारधारेत फरक असलेल्या उमेदवाराला सोबत घेऊन प्रचार कसा करायचा? हा मोठा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे, अशी अजय सरसकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# महापालिका रणधुमाळीत 'चार मते, चार होकार' बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने राजकारण अधिक गुंतागुंतीचे

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**




महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असतानाच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे यंदाची निवडणूक अधिकच रंगतदार आणि तितकीच गुंतागुंतीची ठरत आहे. महापालिकेच्या एकूण ८७ जागांसाठी २२ प्रभाग रचना करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १ ते २२ मध्ये प्रत्येकी चार सदस्य, तर शेवटच्या दोन प्रभागांमध्ये प्रत्येकी तीन सदस्य निवडले जाणार आहेत. त्यामुळे दोन प्रभाग वगळता उर्वरित सर्व प्रभागांतील मतदारांच्या हातात चार मते असून, याच पार्श्वभूमीवर 'चार मते, चार होकार' ही नवी सामाजिक-राजकीय संकल्पना उदयास आली आहे.या निवडणुकीत अमरावतीकरांसाठी एकूण ८७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. बहुतांश प्रभागांमध्ये काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट चुरस पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी स्थानिक आघाड्या, अपक्ष उमेदवार तसेच छोटे पक्षही निवडणूक रणांगणात उतरल्याने लढत अधिक बहुरंगी बनली आहे. प्रचारासाठी घरोघरी फिरणारे उमेदवार, सभा, कोपरा बैठका आणि वैयक्तिक संपर्क मोहिमा यामुळे शहरातील प्रत्येक गल्ली-बोळात राजकीय चर्चा रंगताना दिसत आहेत.मतदारांची भूमिका यंदा विशेष लक्षवेधी ठरत आहे. प्रचारासाठी येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे म्हणणे मतदार शांतपणे, लक्षपूर्वक ऐकून घेत आहेत. विकासकामांची यादी, पक्षाचे बळ, उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा आणि पुढील पाच वर्षांचे आश्वासन हे सर्व ऐकल्यानंतर मतदारांकडून हमीचा 'होकार' दिला जात आहे. मात्र हा होकार अनेकदा चारही उमेदवारांना दिला जात असल्याने उमेदवारही संभ्रमात आहेत.कुणाला नाराज करायचे नाही, कुणाशी उघड वाद घालायचा नाही, कुणाचा रोष ओढवून घ्यायचा नाही, अशीच भूमिका सध्या बहुतांश मतदारांनी घेतल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराला 'तुम्हालाच मत देणार' असा शब्द मिळत असला, तरी प्रत्यक्ष मतदानावेळी नेमकी मते कुणाच्या पारड्यात पडणार, याबाबत अनिश्चितता आहे. उमेदवारही मिळालेल्या होकारांची मनातल्या मनात बेरीज करत असले, तरी शेवटच्या क्षणापर्यंत काळजी कायम आहे.बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे मतदारांसाठी पर्याय वाढले असले, तरी उमेदवारांसाठी मात्र ही पद्धत अधिक आव्हानात्मक ठरत आहे. त्यामुळे यंदाच्या महापालिका निवडणुकीत 'चार मते, चार होकार' हा नारा किती निर्णायक ठरतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अंतिम गणिते महत्त्वाची**

गल्लीबोळ, वॉर्ड, गजबजलेल्या परिसरामध्ये उमेदवारांची सतत ये-जा सुरू आहे. मात्र, या गदारोळात मतदारांनी एक शांत, पण अत्यंत व्यवहार्य भूमिका स्वीकारल्याचे दिसते. प्रचाराचे दृश्य बदलले असून, उमेदवार समाधानी चेहऱ्याने पुढील घराकडे वळतो, तर मतदार मनातल्या मनात अंतिम गणित मांडत राहतो. प्रत्यक्षात कोणाला मत मिळणार, याचा निर्णय मतदान यंत्रासमोरच होणार असला, तरी प्रचाराच्या टप्प्यावर सर्वांनाच दिला जाणारा 'होकार' हीच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीची सर्वात ठळक आणि लक्षवेधी बाब ठरत आहे. त्यामुळे कोण जिंकणार, कोण हरणार याचा अंदाजली लावला जात आहे.

# पुढच्या गुरूवारी अमरावती सह राज्यात सार्वजनिक सुट्टी

## शाळा-सरकारी कार्यालये राहणार बंद




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडालाय. १५ जानेवारी रोजी २९ महापालिकेसाठी मतदान होणार आहे. आयोगाकडून मतदान प्रक्रियेला वेग आलाय. महापालिका निवडणुका सुलभ करण्यासाठी राज्य सरकारने १५ जानेवारी २०२६ रोजी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

अंतर्गत राज्य सरकारने महाराष्ट्रात १५ जानेवारी, गुरूवारी सुट्टी जाहीर केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील जिल्ह्यांसह पुणे आणि राज्यातील २९ महानगरपालिकेत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी महापालिकेचे मतदान होणार आहे, त्या सर्व ठिकाणी गुरूवारी शाळा, सरकारी कार्यलयाला सुट्टी देण्यात आली आहे.

सरकारने डिसेंबरमध्ये राज्य सरकारने २०२६ मधील २४ सार्वजनिक सुट्ट्यांची यादी जाहीर केली होती. त्या यादीमध्ये १५ जानेवारीच्या सुट्टीचा समावेश नव्हता. सार्वजनिक सुट्टी फक्त महापालिका निवडणुका होत असलेल्या ठिकाणीच असेल, असे राज्य सरकारकडून एका प्रसिद्धीपत्रकात सांगण्यात आले आहे. दरम्यान, १५ जानेवारी रोजी बँका सुरू राहणार असल्याचे समजतेय. कारण, आरबीआयकडून अद्याप १५ जानेवारीच्या सुट्टीबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. त्यामुळे शेअर बाजार आणि बँका १५ जानेवारी रोजी सुरूच राहणार आहेत.

मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकसह महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या सर्व महापालिकेचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येत आहे. ३० डिसेंबर २०२५ पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची परवनागी होती. तर २ जनेवारी रोजी उमेदवारी अर्ज माघारी घेता येत होता. मुंबई आणि इतर महापालिकेसाठी राज्यात प्रचार वेगात सुरू आहे. आशियातील सर्वात श्रीमंत महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी सत्ताधारी भाजप-शिंदेसेना आणि ठाकरेसेना-मनसे यांच्यात चूरस पाहायला मिळत आहे. १६ जानेवारी रोजी राज्यात कोण कोणत्या महापालिकेवर कब्जा मिळवतो, हे निश्चित होणार आहे. सध्या प्रचार अंतिम टप्प्यात आहे.

# भाजप-शिवसेना युतीत तणाव; अभिजित अडसूळ यांचा भाजप नेतृत्वावर थेट हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीत तणाव निर्माण झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. भाजपकडून सन्मानजनक जागा न दिल्यामुळे युती तुटल्याचा आरोप शिवसेना नेते अभिजित अडसूळ यांनी केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट सांगितले होते की सन्मानजनक जागा मिळाल्या तरच युती करायची, अन्यथा स्वतंत्र लढा द्यायचा. मात्र, ज्या 'सिटिंग' जागा होत्या त्या देखील भाजप मागत होती आणि एकही जागा देण्यास तयार नव्हती, असा गंभीर आरोप अडसूळ यांनी केला.युतीच्या नावाखाली 'अर्धम' सुरू असल्याची टीका करताना अडसूळ म्हणाले, मी आधीच सांगितले होते की युती करायची असेल तर धर्माने करा. पण हा अधर्म माझ्याच विरोधात विधानसभा निवडणुकीत झाला. त्यावेळी भाजपने ठोस पाऊल उचलले असते तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती. सध्या भाजपची 'क्यू' येत असल्याचे म्हणत त्यांनी वरिष्ठ नेतृत्वाने तातडीने लक्ष घालण्याची गरज व्यक्त केली.

भाजप नेत्या नवनीत राणा या भाजपमध्ये असूनही आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचा प्रचार करत असल्याच्या मुद्द्यावरही अडसूळ यांनी आक्षेप नोंदवला. फोन करून भाजपचे पदाधिकारी रडतात. माझ्यावरही अन्याय झाला आहे, असे ते म्हणाले. योग्य निर्णय न झाल्यास अमरावतीत भाजपचे अस्तित्व धोक्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.भाजप आमदार प्रकाश भारसकडे यांच्यावरही अडसूळ यांनी जहरी टीका केली. प्रकाश भारसकडे यांची राक्षसी महत्त्वाकांक्षा आहे. त्यांनी विधानसभा निवडणुकीत युतीधर्माच्या विरोधात काम केले, असा आरोप करत त्यांनी, साठी बुद्धी, नाठी राक्षसी महत्त्वाकांक्षा, अशी बोचरी टीका केली.याशिवाय अकोल्यात एमआयएम-भाजप युतीच्या चर्चांवरूनही अडसूळ यांनी नाराजी व्यक्त केली. अशा गोष्टींना वेळीच आळा घातला नाही तर भाजपचे पतन व्हायला वेळ लागणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. या आरोप-प्रत्यारोपांमुळे अमरावतीतील राजकीय वातावरण अधिकच तापण्याची चिन्हे आहेत.




# प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेत ऑनलाइन नोंदींचा बोजवारा दुपारी २ पर्यंत माहिती न भरल्यास शाळाप्रमुखांवर कारवाईचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांना दैनंदिन लाभार्थी संख्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती व वितरित आहाराची माहिती 'सरल' प्रणालीवर ऑनलाइन नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक शाळांकडून ही माहिती नियमितपणे व वेळेत भरली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेत दुपारी २ वाजेपर्यंत माहिती नोंद न केल्यास संबंधित शाळा व शाळाप्रमुखांवर कारवाईचा इशारा दिला आहे.शासनाकडून 'एएमएस' प्रणालीद्वारे दररोज 'सरल'वरील नोंदींची पडताळणी करण्यात येत आहे. या पडताळणीत अनेक शाळांमध्ये प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना आहार वितरित करण्यात येत असतानाही त्याची ऑनलाइन नोंद नसल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी शासनाच्या अहवालात विद्यार्थ्यांना आहार मिळाला नसल्याची चुकीची नोंद होत असून, याचा थेट परिणाम योजनेच्या निधी वितरण, नियोजन व गुणवत्ता तपासणीवर होत आहे. त्यामुळे योजनेच्या मूळ उद्दिष्टांनाच धक्का बसत असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे.वेळेत माहिती नोंदवली नाही तर संबंधित शाळाप्रमुख, पर्यवेक्षक तसेच शिक्षण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असून कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे शिक्षक व शाळा संचालकांमध्ये खळबळ उडाली आहे.प्रत्येक शाळेने दररोज वितरित आहाराची माहिती, लाभार्थी संख्या आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती 'सरल' प्रणालीवर ऑनलाइन नोंदवणे आवश्यक असून ही माहिती दुपारी २ वाजेपर्यंत अद्ययावत करणे बंधनकारक आहे. एएमएस प्रणालीद्वारे दररोज या नोंदींची पडताळणी होत असल्याने चुकीच्या, अपूर्ण किंवा उशिरा नोंदी करणाऱ्या शाळांवर थेट लक्ष ठेवले जात आहे.अनेक शाळांकडून कामाचा ताण, अपुरा कर्मचारी वर्ग किंवा तांत्रिक अडचणींची कारणे पुढे केली जात असली, तरी काही ठिकाणी निष्काळजीपणाही आढळून आल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता कोणतीही सबब ग्राह्य धरली जाणार नसून कठोर पावले उचलण्याचा निर्धार करण्यात आला आहे.प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शासकीय व अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक मध्यान्ह भोजन दिले जाते. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी व शालेय गळती रोखावी, हा या योजनेचा मुख्य उद्देश असून जिल्ह्यातील लाखो विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. त्यामुळे योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ऑनलाइन नोंदींची शिस्त काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत